cmyk



दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१८१ | रविवार दि.२० सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# रब्बीच्या १,७७७ लाख टन उत्पादन लक्ष्यापुढे हवामानाचे संकट!

## देशात सप्टेंबरमधील पावसाची तूट २१ टक्क्यांवर; जमिनीतील ओलाव्याची चिंता

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**केंद्र सरकारने आगामी रब्बी हंगामासाठी देशात १ हजार ७७७ लाख टन अन्नधान्य उत्पादनाचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य निश्चित केले आहे. मात्र, रब्बी पिकांच्या पेरणीपूर्वीच देशातील अनेक भागांत पावसाची तूट निर्माण झाल्याने या उत्पादन लक्ष्यापुढे हवामानाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. १८ सप्टेंबरपर्यंत देशात सप्टेंबर महिन्यातील पावसाची तूट २१ टक्क्यांवर पोहोचली असून, प्रमुख रब्बी उत्पादक राज्यांमध्येही पावसाचे वितरण असमान राहिले आहे. त्यामुळे रब्बीच्या पेरणीच्या वेळी जमिनीतील ओलावा हा निर्णायक मुद्दा ठरण्याची शक्यता आहे.**

केंद्र सरकारने आगामी रब्बी हंगामासाठी गव्हाचे १ हजार २१० लाख टन, कडधान्यांचे १७२ लाख टन आणि भरडधान्यांचे २२३ लाख टन उत्पादनाचे लक्ष्य ठेवले आहे. याशिवाय हरभऱ्यासाठी १२३.३ लाख टन, मसुरीसाठी २१ लाख टन, मोहरीसाठी १४३ लाख टन आणि बार्लीसाठी २४.२ लाख टन उत्पादनाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. रब्बी भातासाठी १६७.२ लाख टन, मक्यासाठी १६६ लाख टन आणि ज्वारीसाठी ३१.९ लाख टन उत्पादनाचे लक्ष्य आहे. देशाच्या रब्बी हंगामात गहू हे प्रमुख पीक आहे. मागील २०२५–२६ रब्बी



हंगामात देशात १ हजार २०६.६ लाख टन गव्हाचे उत्पादन झाले होते. यंदा त्यापेक्षा अधिक म्हणजे १ हजार २१० लाख टन उत्पादनाचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. मात्र, गव्हाच्या पेरणीपूर्वी जमिनीत पुरेसा ओलावा असणे आवश्यक आहे. सप्टेंबरमधील कमी पावसामुळे काही भागांत ही परिस्थिती चिंतेची ठरू शकते. मागील हंगामात भाताचे १८१.१ लाख टन, मक्याचे २००.२ लाख टन, बार्लीचे १८ लाख टन आणि ज्वारीचे ३०.१ लाख टन उत्पादन झाले होते. हरभऱ्याचे उत्पादन १२५.१ लाख टन, मसुरीचे १७.६ लाख टन आणि ▶▶ पान २ वर

## आरबीआयचा निर्णय ; लातूर जिल्हा बँकेचे संचालक मंत्री बाबासाहेब पाटील यांना ठरवले अपात्र

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदावरून अपात्रतेचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. बँकेच्या संचालकांनी सलग दहा वर्षांपेक्षा अधिक काळ पदावर राहिल्याचा आरोप करत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे (आरबीआय) तक्रार करण्यात आली होती. या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने आरबीआयला तक्रारीवर सहा आठवड्यांत कायद्यानुसार निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत.



माहितीनुसार आरबीआयने बाबासाहेब पाटील यांना संचालकपदावरून बडतर्फ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील माजी कर्मचारी सतीश शेषराव जाधव यांनी या संदर्भात तक्रार केली होती. त्यांच्या म्हणण्यानुसार, बँकेच्या १९ संचालकांपैकी काही संचालकांनी कायद्यातील निर्धारित कालावधीपेक्षा अधिक काळ संचालक म्हणून काम केले आहे. मे २०२६ मध्ये आरबीआयकडे करण्यात आलेल्या तक्रारीत आठ संचालकांच्या अपात्रतेचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. ▶▶ पान २ वर

## दुष्काळी बैठकीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांऐवजी नेत्यांचा काजू-बदामावर ताव



**नांदेड । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील शेतकरी दुष्काळाच्या संकटाने होरपळत असताना, नांदेडमध्ये आयोजित करण्यात आलेल्या दुष्काळी आढावा बैठकीत नेत्यांमध्येच जोरदार शाब्दिक खडाजंगी झाल्याचे समोर आले आहे. शेतक–यांच्या ज्वलंत प्रश्नांवर चर्चा करून त्यावर उपाययोजना करण्यासाठी आयोजित केलेल्या बैठकीत नेत्यांनी काजू बदामावर ताव मारला. याबाबतचा व्हीडीओ ▶▶ पान २ वर

### कृषीमंत्र्यांचा ताफा अडवून भेट दिले काजू–बदाम ;शेतकरी आक्रमक

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांचा संतप्त शेतकऱ्यांनी ताफा अडवून भरणे यांना चक्क काजु– बदाम भेट देऊन आपला संताप व्यक्त केला. शनिवारी दुपारी ३ च्या सुमारास कृषीमंत्री भरणे यांनी वसमत जवळील टाकळगाव येथे दुष्काळाने उद्धवस्त झालेल्या पिकांची पाहणी केली. पाहणीदरम्यान, उपस्थित शेतकऱ्यांनी त्यांचा ताफा अडवून त्यांना काजु–बदाम दिले. तसेच शेतकऱ्यांनी काजु–बदाम खायेंगे, दुष्काळ दौरा करेंगे अशा घोषणा देत दुष्काळ पाहणीसाठी आलेल्या कृषीमंत्री भरणे यांना ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली.

## जरांगे पाटलांनी बीड जिल्ह्यात आंदोलन करावं, त्यांचा जालना जिल्ह्याशी काहीही संबंध नाही

**जालना । प्रतिनिधी**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी तब्बल २० दिवसानंतर उफोषण स्थगित केलं आहे. सध्या त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगरमधील गॅलेक्सी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान, उपोषणादरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केल्याचं पाहायला मिळालं. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही टीका केली होती. अशातच आता शिवसेना शिंदे गटाचे जालना उपजिल्हाप्रमुख धनंजय पोहेकर यांनी जरांगे पाटलांवर टीका केलीय. मनोज जरांगे यांनी त्यांच्या बीड जिल्ह्यात आंदोलन करावं असं पोहेकर म्हणाले आहेत.


मनोज जरांगे पाटील यांनी बीड जिल्ह्यात जावं, आमच्या जिल्ह्यात त्यांचे काहीच नाही असं म्हणत शिवसेना शिंदे गटाचे जालना उपजिल्हाप्रमुख धनंजय पोहेकर यांनी जरांगे पाटलांवर टीका केलीय. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील टीका सहन करणार नाही असा इशारा देखील पोहेकर यांनी दिलाय. सणासुदीचं आमच्या जिल्ह्यात भांडण लाऊ लागलेत असे पोहेकर म्हणाले. मनोज जरांगे यांनी त्यांच्या बीड जिल्ह्यामध्ये जाऊन आंदोलन करावं आमच्या जालना जिल्ह्यामध्ये त्यांचा काहीही संबंध ▶▶ पान २ वर

## सर्वेक्षणानंतर तातडीने मदत देणार

### फडणवीसांचे मंत्र्यांना पाहणी करण्याचे निर्देश

**नागपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण झाली असून, मंत्रिमंडळाच्या बैठकीत या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर मंत्र्यांना आपापल्या क्षेत्रातील प्राथमिक पाहणी करण्याचे आणि पूर्वतयारीचे नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले



आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले, पावसातील खंडामुळे उभ्या पिकांचे नुकसान झाले आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंत्र्यांनी यावर चर्चा केली. मी त्यांना जिल्ह्यांत प्राथमिक पाहणी करण्याचे आणि पूर्वतयारीचे नियोजन करण्याचे निर्देश दिले. मला वाटते की, पुढील आठवड्याभरात आम्ही प्राथमिक आढावा पूर्ण करू. त्यानंतर आम्ही पिकांचे अधिकृत सर्वेक्षण (पंचनामे) करू ▶▶ पान २ वर

## केतन अग्रवाल हत्या प्रकरण:पोलिसांकडून २५०० पानी चार्जशीट दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील प्रसिद्ध लोहगड किल्ल्यावर व्यावसायिक केतन अग्रवाल यांच्या हत्येप्रकरणाला आता महत्त्वाचे कायदेशीर वळण मिळाले आहे. लोणावळा ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणाचा तपास पूर्ण करून तब्बल २५०० पानांचे दोषारोपपत्र वडगाव मावळ येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात दाखल केले आहे. भावी पत्नी सिया गोयल हिने साथीदार चेतन चौधरीच्या मदतीने केतनची दरीत ढकलून हत्या केल्याचा संशय पोलिसांनी तपासातून व्यक्त केला आहे.

या प्रकरणाच्या तपासादरम्यान पोलिसांनी विविध प्रकारचे भौतिक, तांत्रिक आणि वैद्यकीय पुरावे जमा केले. हे सर्व पुरावे आरोपपत्रासोबत न्यायालयात सादर करण्यात आले आहेत. घटनास्थळावरून जप्त केलेल्या वस्तू, फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीचे अहवाल आणि डिजिटल ▶▶ पान २ वर

## ‘व्यापारी, ग्राहक यांच्यावर डिजिटल सापळा’

### युपीआयवरील शुल्कावरुन राज ठाकरेंकडून टीका




**मुंबई । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने यूपीआयसंदर्भात नवीन नियम जारी केला आहे. युपीआय पेमेंटवर लागू होणाऱ्या नव्या शुल्काच्या नियमांमुळे ग्राहक आणि व्यापाऱ्यांमध्ये जोरदार चर्चा सुरू आहे. १५ ऑक्टोबरपासून हा नियम लागू केला जाणार आहे. त्यामुळे आता सर्वात मोठा प्रश्न असा उपस्थित केला जात आहे की, यूपीआयने पेमेंट केल्यावर सामान्य लोकांना पैसे द्यावे लागणार का? यावर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी सूचक पोस्ट केली आहे. राज ठाकरे यांनी आपल्या ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### ‘मेरी डिग्री का क्या’ मुंबई युवक काँग्रेसचे अभियान

मुंबई: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात विविध कार्यक्रम होत असताना, मुंबई युवक काँग्रेसने बेरोजगार तरुणांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी ‘मेरी डिग्री का क्या?’ या अभियानाची सुरुवात केली. मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन यांनी गांधी भवन पत्रकार परिषद घेऊन या अभियानाची माहिती दिली. देशातील लाखो तरुण उच्च शिक्षण घेऊन पदव्या मिळवत आहेत; मात्र शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना रोजगारासाठी संघर्ष करावा लागत आहे. पदवी मिळाली, पण नोकरी कधी मिळणार? सरकारी भरती कधी होणार? आमच्या भविष्याचे काय? असे सवाल या अभियानाच्या माध्यमातून उपस्थित करण्यात आले आहेत. पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त बेरोजगार तरुणांनी प्रतीकात्मक स्वरूपात ‘डिमांड केक’ कापून ‘मेरी डिग्री का क्या?’ असा सवाल सरकारला केला.

### सर्वोच्च न्यायालयाचे मद्यबंदी कायद्यावर प्रश्नचिन्ह

दिल्ली: मद्यबंदीच्या परिणामकारकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, सर्वोच्च न्यायालयाने मद्यबंदीशी संबंधी महसुलाचे नुकसान, बंदीच्या अंमलबजावणीवर होणारा खर्च, पोलिसांमधील भ्रष्टाचार, बेकायदेशीर मद्यनिर्मिती आणि त्यातून उद्भवणारी अमली पदार्थांची समस्या अशा पाच दुष्परिणामांकडे लक्ष वेधले; तसेच गेल्या काही वर्षांत गुजरात आणि इतर राज्यांमध्ये घडलेल्या विषारी मद्याच्या अनेक दुर्घटनांचाही उल्लेखही केला. १९९१ मध्ये मुंबईत मिथॅनॉलयुक्त विषारी दारू पिऊन सुमारे ९३ लोकांचा मृत्यू झाला होता. या दुर्दैवी घटनेनंतर महाराष्ट्र सरकारने राज्याचे तत्कालीन अतिरिक्त पोलीस महासंचालक पी. आर. पार्थसारथी यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना केली होती. या समितीने विषारी दारूच्या दुर्घटनंचा अभ्यास करून उपाययोजनांची शिफारस केली होती. याच शिफारशींच्या आधारे २०११ मध्ये ’महाराष्ट्र विष नियम’ मध्ये सुधारणा करण्यात आल्या होत्या.

### ठाकरेंवर आरोप करणाऱ्यांनी पुरावा दाखववावा–सरदेसाई

मुंबई: दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी मानहानीची नोटीस देण्यासाठी वकिलांसह मातोश्री येथे पोहोचत ठाकरेंच्या वकिलांकडे नोटीस सोपवली. यापूर्वी शिवसेना(ठाकरे) पक्षाचे आमदार वरुण सरदेसाई (तर्रीप डरीवशीरळ) यांनी दिशा सालियन प्रकरणावरुन भूमिका मांडताना, नेते आदित्य ठाकरे त्या लोकांना ओळखत देखील नव्हते. राजकीय प्रतीमा मलीन करण्याचा प्रकार असल्याचे सरदेसाई यांनी म्हटले. सरदेसाई म्हणाले, एकतरी पुरावा आहे का तुमच्याकडे? तपासात काय ते पुढे येईल परंतु आता आदित्य ठाकरेंच्या विरोधात पुराव आहे का? सीबीआय चौकशी होऊ द्या, काय ते पुढे येईल, असे सरदेसाई म्हणाले. दिशाचे वडील सतीश सालियन यांच्याकडून आदित्य ठाकरेंवर केलेले आरोप सरदेसाई यांनी फेटाळून लावले. आदित्य ठाकरे हे सुशांत सिंग आणि दिशा सालियन यांना ओळखत नव्हते.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**


**बीड, दि.१९ सप्टेंबर २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९७.५० क्विंटल | २,५०१ | ३,१५० | २,८९२ |
| ज्वारी/हायब्रिड: २१५.०० क्विंटल | ३,४५० | ५,६०० | ४,२७९ |
| मका/लोकल: ३२.०० क्विंटल | २,७२४ | २,७२४ | २,७२४ |
| तूर : ५.५० क्विंटल | ४,००० | ८,५०० | ७,४३७ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ७,७३० | ७,७३० | ७,७३० |
| बाजरी: १०.०० क्विंटल | २,८०० | ३,०४० | २,९१४ |
| मुग: ६.०० क्विंटल | ५,००० | १०,४५१ | ८,८२९ |
| सोयाबीन: १०.०० क्विंटल | ५,५०० | ५,९५० | ५,७१८ |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,५०० | ६,००० | ५,७३३ |

## तिरुपती लाडू प्रकरणी ‘ईडी’ची कारवाई

### पाम तेल वापरप्रकरणी ‘सुकृती फूड्स’च्या मालकाला अटक



**तिरूपती । वृत्तसंस्था**

**देशातील कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या तिरुपती बालाजी मंदिरातील ’लाडू प्रसादा’साठी वापरल्या जाणाऱ्या तुपात भेसळ केल्याप्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणी ’सुकृती फूड्स’चा मालक कैलास चंद मंगला याला अटक करण्यात आली आहे. तिरुमला तिरुपती देवस्थानला पुरवले जाणारे ’शुद्ध गाईचे तूप’ हे प्रत्यक्षात पाम तेल आणि घातक रसायनांचे मिश्रण होते, असे तपासात स्पष्ट झाले आहे.**

ईडीने दिलेल्या माहितीनुसार, तिरुपती बालाजी मंदिरातील ’लाडू प्रसादा’साठी ढढऊ ला ’अगमार्क स्पेशल ग्रेड गाईचे तूप’ म्हणून पुरवलेले तूप वापरले जात होते. मात्र हे तूप कथितरीत्या रिफाइंड पाम तेल, पाम कर्नल ऑईल, पामोलिन आणि विविध रसायने वापरून तयार केले गेले होते. एका निवेदनात, केंद्रीय एजन्सीने सांगितले की, त्यांच्या हैदराबाद कार्यालयाने तूप भेसळ प्रकरणाच्या संदर्भात १७ सप्टेंबर रोजी कैलास चंद मंगला याला ताब्यात घेतले. त्यानंतर विशाखापट्टणम येथील ’प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉंड्रिंग ▶▶ पान २ वर

## मॉन्सून परतीच्या वाटेवर

### महाराष्ट्रात पुढील ५ दिवस पावसाचा अंदाज

**मुंबई । प्रतिनिधी**

**मॉन्सूनचा परतीचा प्रवास सुरू झाला असून, १९ सप्टेंबरपासून पश्चिम राजस्थानच्या काही भागातून मॉन्सूनने माघार घेतली आहे. पुढील ३ ते ४ दिवसांत राजस्थानच्या आणखी काही भागांसह पंजाब आणि सौराष्ट्र–कच्छमधूनही मॉन्सून माघार घेण्यास अनुकूल वातावरण असल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. दरम्यान, महाराष्ट्रातील काही भागांत हलका ते मध्यम पाऊस पडत**



**आहे. अनेक भागांत मात्र पावसाची प्रतीक्षा कायम असून, काही ठिकाणी उन्हाचा चटका जाणवत आहे. राज्यात पुढील पाच दिवस विविध जिल्ह्यांत पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.**

रविवारी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे व सातारा घाटमाथा, कोल्हापूर घाटमाथा, कोल्हापूर, सातारा, सांगली, पुणे, अहिल्यानगर, सोलापूर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, अमरावती, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली येथे विजांसह पावसाचा अंदाज आहे. मुंबई, ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, छत्रपती संभाजीनगर आणि जालना येथे हलक्या सरी पडण्याची शक्यता आहे. सोमवारी पुणे, सातारा आणि कोल्हापूर घाटमाथ्यासह कोल्हापूर, ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# लोकशाहीचा खून की दडपशाहीचा खेळ?

पश्चिम बंगालमधील नंदिग्राम आणि रेजिनगर पोटनिवडणुकांच्या पार्श्वभूमीवर घडणाऱ्या घटनांनी निवडणूक प्रक्रियेच्या निष्पक्षतेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी गटाला निवडणूक आयोगाच्या निर्णयामुळे पारंपरिक पक्षनाव आणि 'जोडाफूल' चिन्ह गमवावे लागले. आयोगाने दोन्ही गटांना स्वतंत्र नाव आणि चिन्ह देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानंतर नंदिग्राममधील ममता गटाच्या उमेदवार संचिता प्रधान डे यांनी उमेदवारी मागे घेतली. त्यानंतर रेजिनगरचे उमेदवार रबीउल आलम चौधरी यांनीही माघार घेण्याची घोषणा केली. मात्र, पुढे पक्षाशी चर्चा आणि सुरक्षेच्या आश्वासनानंतर चौधरी यांनी पुन्हा निवडणूक लढण्याचा निर्णय घेतल्याचे वृत्त आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाकडे केवळ 'उमेदवार पळाले' अशा राजकीय सोयीच्या भाषेत पाहण्यापेक्षा, नेमके दबावाचे स्वरूप काय होते, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो.

लोकशाही केवळ मतदानाच्या दिवशी मतपेटीसमोर उभे राहण्याचे नाव नाही. निवडणुकीपूर्वी उमेदवारांना मुक्तपणे प्रचार करता येणे, कार्यकर्त्यांना संघटित होता येणे आणि मतदारांना कोणत्याही भीतीशिवाय आपला प्रतिनिधी निवडता येणे ही त्याची मूलभूत पूर्वअट आहे. त्यामुळे एखादा उमेदवार दबाव, कार्यकर्त्यांवरील कारवाई, सुरक्षेची चिंता किंवा निवडणूक चिन्हाच्या अचानक बदलामुळे माघार घेत असल्याचे सांगत असेल, तर त्या दाव्यांची स्वतंत्र आणि पारदर्शक चौकशी होणे आवश्यक आहे. पण याचबरोबर दुसरा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. प्रत्येक उमेदवाराची माघार म्हणजे सरकारी दडपशाहीच, असा निष्कर्ष पुराव्याविना काढता येईल का? नंदिग्रामच्या प्रकरणात संचिता प्रधान डे यांच्या माघारीनंतर ममता बॅनर्जी यांनी काँग्रेस उमेदवाराला पाठिंबा देण्याची घोषणा केली. दुसरीकडे, त्या माघारीपूर्वी त्यांनी मुख्यमंत्री शुभेंदु अधिकारी यांच्याशी भेट झाल्याचे वृत्त आहे. या घटनांचा परस्परसंबंध काय, याचे ठोस उत्तर अद्याप सार्वजनिकरीत्या स्पष्ट झालेले नाही. याच काळात काँग्रेसचे नंदिग्राम उमेदवार मिलन प्रधान यांना २००७ मधील प्रकरणात अटक झाली. पोलिसांनी प्रलंबित वॉरंटचा आधार दिला, तर काँग्रेस आणि ममता गटाने या कारवाईमागे राजकीय हेतूवर प्रश्न उपस्थित केले. येथेही दोन्ही बाजूंचे दावे नोंदवून, कायदेशीर प्रक्रियेची स्वतंत्र तपासणी होणे आवश्यक आहे. आरोप म्हणजे पुरावा नव्हे आणि सरकारी स्पष्टीकरण म्हणजे अंतिम सत्यही नव्हे. मात्र या घटनांची मालिका लोकशाहीसाठी अस्वस्थ करणारी आहे, एवढे नक्की. कारण निवडणूक आयोगासमोर पक्षांतर्गत संघर्ष, उमेदवारांच्या माघारी, पक्षचिन्हाचा वाद आणि त्याच वेळी कार्यकर्त्यांवरील दबावाच्या तक्रारी उभ्या राहत असतील, तर निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास टिकवणे ही सर्व संबंधित संस्थांची जबाबदारी आहे. सत्ताधारी पक्ष असो किंवा विरोधकनिवडणूक ही कोणत्याही पक्षाची खासगी मालमत्ता नाही. निवडणूक आयोग, पोलीस प्रशासन आणि न्यायव्यवस्था या संस्थांकडून समान अंतर आणि पारदर्शकता अपेक्षित असते. विरोधकांवर कारवाई झाली तर ती कायदेशीर प्रक्रियेतून आणि पुराव्यांच्या आधारेच झाली पाहिजे; सत्ताधाऱ्यांवर आरोप झाले तर त्यांचीही तितक्याच कसोटीवर तपासणी झाली पाहिजे. पश्चिम बंगालमधील या घटनांनी म्हणूनच केवळ ममता बॅनर्जी किंवा त्यांच्या पक्षाचा प्रश्न निर्माण केलेला नाही. प्रश्न आहे तो मतदाराच्या स्वातंत्र्याचा. उमेदवार बदलतो, पक्षाचे चिन्ह बदलते, कार्यकर्त्यांवर कारवाईचे आरोप होतात आणि प्रचाराच्या वातावरणाबाबत प्रश्न निर्माण होतातअशा वेळी मतदाराने कोणावर विश्वास ठेवायचा? लोकशाहीचा खरा कस सत्ताधाऱ्यांना विरोध सहन करण्यात असतो. विरोधकांना निवडणूक लढण्याची समान संधी मिळणे ही लोकशाहीची किमान अट आहे. त्याच वेळी विरोधकांनीही प्रत्येक प्रशासकीय कारवाईला 'षड्यंत्र' ठरवण्याऐवजी पुरावे जनतेसमोर ठेवणे आवश्यक आहे. पश्चिम बंगालमधील पोटनिवडणुका ६ ऑक्टोबरला होणार आहेत. आता खरी गरज आहे ती आरोप-प्रत्यारोपांची धुरळवण करण्याची नव्हे, तर प्रत्येक निर्णयाची पारदर्शक तपासणी करण्याची. उमेदवारांनी माघार का घेतली? कार्यकर्त्यांवर नेमका कोणता दबाव होता? पोलिसांच्या कारवायांना कायदेशीर आधार काय? आणि निवडणूक आयोगाच्या निर्णयामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत मतदारांची दिशाभूल होऊ नये यासाठी काय केले जात आहे? या प्रश्नांची उत्तरे मिळाली तरच लोकशाहीवरील विश्वास टिकेल. कारण लोकशाहीचा खून नेहमी गोळीबारानेच होत नाही. कधी तो भीतीच्या वातावरणात होतो, कधी संस्थांवरील अविश्वासातून आणि कधी मतदारासमोर असलेले पर्याय कमी करून होतो. म्हणूनच आजचा प्रश्न 'ममता जिंकतील की कोण?' हा नसून त्याहून मूलभूत आहेमतदाराला निर्भयपणे निवड करण्याची संधी मिळते आहे का? या प्रश्नाचे उत्तर सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही जनतेसमोर द्यायला हवे.

## प्रेमसंबंधास नकार; तरुणीला मारहाण, ॲसिड टाकून जीवे मारण्याची धमकी

**जालना। प्रतिनिधी**

**मैत्रीचे रूपांतर प्रेमसंबंधात झाल्यानंतर संबंध ठेवण्यास नकार दिल्याच्या कारणावरून तरुणीला शिवीगाळ करून लाथा-बुक्क्यांनी मारहाण तसेच ॲसिड टाकून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार जालना शहरात घडला. याप्रकरणी धाराशिव जिल्ह्यातील भूम येथील तिघांविरुद्ध तालुका जालना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुणीची सुमारे वर्षभरापूर्वी सलमान दस्तगीर पठाण (रा. भूम, जि. धाराशिव) याच्याशी ओळख झाली होती. पुढे या ओळखीचे रूपांतर प्रेमसंबंधात झाले. सुमारे दोन महिन्यांपूर्वी सलमान हा जालना येथील तरुणीच्या घरी आला होता. त्यावेळी तो दोन ते तीन दिवस तेथे राहिला. या काळात त्याने तरुणीच्या संमतीशिवाय तिची रॉयल एनफिल्ड बुलेट घेऊन गेल्याचे तक्रारीत नमूद आहे. दरम्यान, १० सप्टेंबर रोजी दुपारी साडेचारच्या सुमारास तरुणी घराकडे जात असताना सलमान तिच्याजवळ आला. त्याने तिला गाडीत बसून सोबत येण्यास सांगितले. तिने नकार दिल्यानंतर त्याने शिवीगाळ करून लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच प्रेमसंबंध ठेवले नाहीत तर जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्याच्यासोबत असलेले सौरभ लोखंडे आणि शोहेब शेख (दोघेही रा. भूम, जि. धाराशिव) यांनीही शिवीगाळ केल्याचे नमूद आहे. यावेळी सलमानने तरुणीचा आयफोन बळजबरीने हिसकावून नेल्याचा आरोप आहे. यानंतर १६ सप्टेंबर रोजी दुपारी तीनच्या सुमारास सलमानने मोबाईलवरून व्हॉईस कॉल करून प्रेमसंबंध ठेवले नाहीत तर अंगावर ॲसिड टाकून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी तरुणीच्या फिर्यादीवरून सलमान दस्तगीर पठाण, सौरभ लोखंडे आणि शोहेब शेख यांच्याविरुद्ध तालुका जालना पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील कलम ३०४ (२), ३०५, ११५ (२), ३५१ (२), ३५१ (४), ३५२, ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक घनश्याम अंतराप करीत आहेत.

## मंठा तालुक्यातील तलाठ्यांना मुख्यालय राहण्याची अलर्जी

### तलाठ्यांच्या कारभाराची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी



**जालना। प्रतिनिधी**

**मंठा तालुक्यातील तलाठ्यांना मुख्यालय राहण्याची अलर्जी जिल्हाधिकारी यांनी चौकशीचे आदेश देऊन कारवाई करावी अशी मागणी सर्वसामान्य शेतकऱ्याकडून होत आहे. मंठा तालुक्यातील वाटुर फाटा येथील तलाठी घर का आणि घाट का अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. सदरील तलाठी कधीच कार्यालयामध्ये सापडत नाही असे बोलल्या जात आहे. तर काही तलाठी त्यांच्या नियुक्त तलाठी सज्जा व मुख्यालयी नियमितपणे उपस्थित राहत नसल्याच्या तसेच मंठा शहरातील खासगी ठिकाणांहून संबंधित गावांचा महसुली कारभार चालविला जात असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत. या तक्रारींची तात्काळ निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी संभाजी भिगडे यांच्या वतीने करण्यात आली आहे.**

निवेदनात काही तलाठी नियुक्त मुख्यालयी वास्तव्यास व कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. शासनाने तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांना कार्यालयीन ठिकाणी उपस्थित राहण्याबाबत वेळोवेळी निर्देश दिलेले असतानाही त्याची अंमलबजावणी होते का, याची अचानक तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच सातबारा, फेरफार, होल्डिंग, ई-पीक नोंदणी व इतर महत्त्वाच्या महसुली कागदपत्रांसाठी खासगी व्यक्ती किंवा मध्यस्थांचा वापर केला जात असल्याच्या तक्रारींचीही चौकशी करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. शासकीय अभिलेखांची सुरक्षितता तसेच नागरिकांच्या जमिनीशी संबंधित माहितीच्या गोपनीयतेबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. तलाठ्यांच्या नावाने किंवा त्यांच्या वतीने खासगी व्यक्तींकडून शासकीय कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या केल्या जात असल्याच्या तक्रारींची स्वतंत्र चौकशी करून दोष आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सातबारा, होल्डिंग, फेरफार व इतर महसुली कागदपत्रांसाठी शासनाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक रक्कम नागरिकांकडून किंवा शेतकऱ्यांकडून घेतली जात असल्याच्या तक्रारींचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. अतिरिक्त शुल्क आकारणी सिद्ध झाल्यास संबंधितांकडून नियमाप्रमाणे रक्कम वसूल करून प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी, असे निवेदनात नमूद आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी संबंधित व्यक्तींच्या प्रभावापासून मुक्त ठेवून वरिष्ठ व सक्षम महसूल अधिकाऱ्यामार्फत निष्पक्ष आणि वेळबद्ध पद्धतीने करावी, तसेच आवश्यक कागदपत्रे, छायाचित्रे, स्वाक्षऱ्यांचे पुरावे व शुल्क आकारणीसंबंधी पुरावे तपासावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

## शेतकऱ्यांचे सौरपंप आणि प्लेट्स चोरणारी टोळी जेरबंद; तीन आरोपींना अटक

**गेवराई । प्रतिनिधी**

**चारचाकी वाहनाचा वापर करून शेतकऱ्यांचे शेतातील सोलार पंप व सौर प्लेट्स चोरणाऱ्या तीन आरोपींच्या मुसक्या आवळण्यात गेवराई पोलिसांना यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी ४० हजार रुपये किमतीचा चोरीचा सौरपंप आणि गुन्ह्यासाठी वापरलेली दीड लाख रुपयांची कार असा मुद्देमाल जप्त केला आहे.**

माादळमोही पोलीस चौकी अंतर्गत जव्हारवाडी (ता. गेवराई) येथील शेतकरी भगवान विठोबा जवरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा (गुरनं ५५८/२०२६) दाखल करण्यात आला होता. भारतीय न्याय संहिता (बीएनएस-२०२३) कलम ३०३(२) आणि ३(५) अन्वये हा गुन्हा नोंदवण्यात आला होता. या




गुन्ह्याचा तपास करत असताना पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे तीन संशयितांना ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी राजेंद्र हरिभाऊ जवरे, पोपट नवनाथ गुजर (दोघे रा. जव्हारवाडी, ता. गेवराई) आणि नारायण तुकाराम गव्हाणे (रा. चिखली, ता. गेवराई) या तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. पोलीस कोठडी दरम्यान या आरोपींची कसून चौकशी केली असता, त्यांनी सौरपंप चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्याकडून ४० हजार रुपये किमतीचा सौरपंप आणि गुन्ह्यात वापरलेली कार (क्र. एमएच-४६-एडी-२५४२, अंदाजे किंमत १,५०,०००/- रुपये) जप्त केली आहे. अटकेतील आरोपींकडे अधिक चौकशी केली असता, त्यांनी मादळमोही पोलीस चौकी हद्दीत आणखी दोन ठिकाणांहून सोलार प्लेट्स चोरल्याची कबुली दिली आहे. या गुन्ह्यांच्या अनुषंगाने आरोपींकडून आणखी मुद्देमाल हस्तगत करण्याची कारवाई सुरू असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार विजय परजणे (बक्कल नंबर २१३४) हे करत आहेत. सदर कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि गेवराईचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकामध्ये गेवराईचे पोलीस निरीक्षक किशोर पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक अतुलकुमार लांडगे, राजाभाऊ गर्जे, पो.ह. विजय परजणे, पो.ह. प्रल्हाद देवडे, पो.ह. संजय गुजर आणि पोलीस शिपाई शेखर हिंगावार (सर्व रा. पोलीस चौकी मादळमोही) यांचा सहभाग होता.

## पान १ वरून...

### रब्बीच्या १,७७७ लाख टन उत्पादन

मोहरीचे १३७.७ लाख टन झाले होते. यंदाच्या उत्पादन लक्ष्याच्या तुलनेत ही आकडेवारी पाहता अनेक पिकांसाठी उत्पादन वाढीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. रब्बी पिकांसाठी महत्त्वाच्या उत्पादक राज्यांमध्ये सप्टेंबरमधील पावसाचे चित्र चिंताजनक आहे. १ ते १८ सप्टेंबरदरम्यान उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशात सरासरीपेक्षा आठ टक्के अधिक पाऊस झाला आहे. उत्तर प्रदेश हे देशातील सर्वात मोठे गहू उत्पादक राज्य असून मध्य प्रदेश गहू उत्पादनात दुसऱ्या, तर हरभरा उत्पादनात तिसऱ्या क्रमांकावर आहे. दुसरीकडे, पंजाबमध्ये सप्टेंबरमधील पाऊस सरासरीपेक्षा तब्बल ५६ टक्के कमी, तर हरियाणामध्ये ४२ टक्के कमी झाला आहे. गहू उत्पादनासाठी ही दोन्ही राज्ये अत्यंत महत्त्वाची असल्याने पेरणीपूर्वीच्या पावसाच्या तुटीचा परिणाम जमिनीतील ओलाव्यावर होण्याची शक्यता आहे. मोहरी उत्पादनात देशात आघाडीवर आणि हरभरा उत्पादनात दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या राजस्थानमध्येही १ ते १८ सप्टेंबरदरम्यान पावसाची आठ टक्के तूट नोंदवण्यात आली. महाराष्ट्रातील हरभरा उत्पादक भागांमध्ये सप्टेंबरमधील पाऊस सरासरीपेक्षा तब्बल ५१ टक्के कमी असल्याचे चित्र आहे. भारतीय हवामान विभागाने सप्टेंबर महिन्यासाठी सरासरीपेक्षा अधिक तापमान आणि सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे केंद्राने निश्चित केलेले १ हजार ७७७ लाख टन अन्नधान्य उत्पादनाचे लक्ष्य गाठण्यासाठी रब्बीच्या पेरणीच्या काळातील हवामान महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. विशेषतः पावसाची मोठी तूट असलेल्या भागांत जमिनीतील ओलावा अपुरा राहिल्यास बियाण्यांची उगवण, पिकांची सुरुवातीची वाढ आणि पुढील उत्पादनावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

**एल निनो चा परिणाम कायम...**

रब्बी हंगामासाठी सप्टेंबरमधील पाऊस महत्त्वाचा मानला जातो. ऑक्टोबरपासून खरीप पिकांची काढणी सुरू झाल्यानंतर रब्बी पिकांच्या पेरणीला सुरुवात होते. त्यापूर्वी सप्टेंबरमधील पाऊस जमिनीतील ओलावा वाढविण्यास मदत करतो. मात्र, यंदा पावसाचे वितरण असमान राहिल्याने अनेक भागांत पेरणीच्या वेळी पुरेसा ओलावा उपलब्ध असेल का, हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच आगामी काळात एल निनोचा प्रभाव अधिक तीव्र होण्याचा अंदाज व्यक्त केला जात असल्याने तापमान, पावसाचे वितरण आणि जमिनीतील ओलावा यावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

----------

### दुष्काळी बैठकीत शेतकऱ्यांच्या

व्हायरल झाल्याने शेतक-यांसह सामान्य नागरिकांमधून नेत्यांविषयी तीव्र संताप व्यक्त होत आहे. नांदेड येथील वातानुकूलित नियोजन भवनाच्या थंडगार कक्षात आठ जिल्ह्यांसाठी ही आढावा बैठक पार पडली. मराठवाड्यातील अनेक भागांत शेतकरी दुष्काळाच्या झळा सोसत आहेत. पिकांचे नुकसान, पाण्याची टंचाई, पीकविमा, कर्जाचा प्रश्न आणि नुकसानभरपाई अशा अनेक समस्यांनी शेतकरी त्रस्त असताना, या प्रश्नांवर ठोस चर्चा होणे अपेक्षित होते. बैठकीच्या सुरुवातीला राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पुष्पगुच्छ आणि सत्कार स्वीकारण्यास नकार देत साधेपणाचा संदेश देण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यानंतर बैठकीतील वातावरण काही वेळातच बदलले. दुष्काळी परिस्थितीवर चर्चा सुरू असताना नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या. शेतक-यांच्या अडचणींवर चर्चा करून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याऐवजी बैठकीत वैयक्तिक आणि राजकीय मुद्द्यांवरून वाद झाल्याचे चित्र समोर आले. या बैठकीत काही नेते आणि लोकप्रतिनिधींमध्ये काजू-बदाम तसेच इतर खाद्यपदार्थांच्या मुद्द्यावरूनही टोलेबाजी झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे दुष्काळी आढावा बैठक नेमकी शेतक-यांच्या प्रश्नांवर उपाय शोधण्यासाठी होती की नेत्यांच्या आरोप-प्रत्यारोपांसाठी, असा सवाल उपस्थित केला जात आहे. यावेळी ऊर्जा, पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, खासदार रामराव वडकुते, खासदार प्रा. रविंद्र चव्हाण, खासदार संजय चव्हाण, खासदार नागेश पाटील आष्टीकर, आमदार सर्वश्री. हेमंत पाटील, अमरनाथ राजूरकर, सईद खान, कैलास पाटील, बाबूराव कदम कोहळीकर, भिमराव केराम, राजेश पाटील, राजू नवघरे, प्रताप पाटील चिखलीकर, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्र मणी, कृषी आयुक्त सुरज मांढरे, उपायुक्त रिता मैत्रेवार, वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होत्या. तर खासदार अशोकराव चव्हाण, खासदार अजित गोपछडे, खासदार ओमराजे निंबाळकर, खासदार बजरंग सोनवणे, खासदार डॉ. कल्याण काळे यांच्यासह विविध विधानसभा मतदार संघातील आमदार दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

---------

### आरबीआयचा निर्णय ; लातूर जिल्हा बँकेचे

या आठ जणांमध्ये सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासह अशोकराव पाटील निलंगेकर, श्रीपतराव काकडे, स्वयंप्रभा पाटील, व्यंकटराव बिरादार, पृथ्वीराज शिरसाट, प्रमोद जाधव आणि नागोराव आर. पाटील यांचा समावेश असल्याचे न्यायालयीन कार्यवाहीशी संबंधित वृत्तात नमूद करण्यात आले आहे. सहकारी बँकांच्या संचालकांच्या कार्यकाळाबाबत बँकिंग रेग्युलेशन कायद्यातील तरतुदींमध्ये बदल करण्यात आला आहे. २०२५ मधील दुरुस्तीनंतर राज्य सहकारी बँका आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील संचालकांचा कमाल सलग कार्यकाळ दहा वर्षांपर्यंत निश्चित करण्यात आला. ही सुधारित तरतूद १ ऑगस्ट २०२५ पासून लागू झाली. आरबीआयने २०२६ मध्ये जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये दहा वर्षांचा सलग कार्यकाळ पूर्ण केलेल्या संचालकांना त्याच बँकेच्या संचालक मंडळावर पुन्हा येण्यासाठी तीन वर्षांचा 'कूलिंग ऑफ' कालावधी ठेवण्याची तरतूद केली आहे.

---------------

### सर्वेक्षणानंतर तातडीने मदत देणार

आणि तातडीने मदत देऊ. कर्जमाफीचे कामही सुरू असून आतापर्यंत तीन याद्या जाहीर करण्यात आल्या आहेत. उर्वरित याद्यांचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश मी दिले आहेत. शेतकऱ्यांना आवश्यक असलेली तातडीची मदत सरकारकडून दिली जाईल. तसेच पिण्याचे पाणी आणि चारा यांचीही व्यवस्था केली जाईल. एल निनोमुळे संकट ओढवण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्य सरकारने वैरण विकास कार्यक्रम सुरू केला होता, ज्याद्वारे चाऱ्याची टंचाई दूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. आम्ही शेतकऱ्यांना संध्याकाळच्या वेळी अतिरिक्त वीज मिळण्याची व्यवस्थाही केली आहे. आता आम्ही विविध भागांत अतिरिक्त वीज पुरवठा करत आहोत. सरकारकडून राबवल्या जाणाऱ्या विविध उपाययोजनांमुळे राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, ४ जून रोजी केरळमध्ये आगमन झाल्यानंतर ९ जुलैपर्यंत नैऋत्य मोसमी पावसाने (मान्सूनने) संपूर्ण भारत व्यापला होता. ४ जून ते १९ सप्टेंबर या कालावधीत देशाला १५ टक्के पावसाच्या तुटीचा सामना करावा लागला आहे. सध्या, दक्षिण द्वीपकल्पीय भाग सर्वाधिक प्रभावित झाला असून, तिथे पावसाची तूट २९ टक्के इतकी आहे. महाराष्ट्र हा याच द्वीपकल्पीय भागाचा एक भाग आहे.

---------

### जरांगे पाटलांनी बीड जिल्ह्यात आंदोलन करावं,

नसून सणासुदीच्या दिवसात त्यांनी भांडण लावण्याचे काम करू नये असा इशारा शिवसेना उपजिल्हाप्रमुख धनंजय पोहेकर यांनी केला आहे.

--------------

### 'व्यापारी, ग्राहक यांच्यावर

फेसबुक पोस्टमध्ये म्हटले आहे की, केंद्र सरकारने युपीआय व्यवहारांवर अगदी सरसकट नाही पण शुल्क लावून भारतीयांवर मग ते व्यापारी असोत की ग्राहक यांच्यावर, 'डिजिटल सापळा' लावला आहे. आधी नोटबंदी करून डिजिटल व्यवहाराला चालना देत असल्याचे दाखवत युपीआय व्यवस्था आणली. मग त्याचा गाजावाजा केला, स्वतःची स्तुती करून घेतली, लोकांना सवय लावली, अचानक एके दिवशी घोषित करून टाकले की, आता या व्यवहारांवर शुल्क लागेल. थोडक्यात नागरिकांना गुंगवत ठेवले आणि हळूच 'डिजिटल सापळ्यात' पकडले. मी गेली अनेक वर्षं सांगतोय की, गाफील राहू नका किंवा सगळं किती आलबेल आहे आणि किती छान सुरू आहे असं अजिबात मानू नका. तुमच्या दारांवर हे सरकार कधीतरी टकटक करणार आणि त्याची सुरुवात झाली आहे. सरकारने डिजिटल व्यवहारांसाठी युपीआय व्यवस्था आणली, तिला प्रतिसाद मिळेल असं बघितलं गेले. तिला प्रतिसादही मिळाला; पण जर हेतू डिजिटल पेमेंट व्यवस्था आणून आर्थिक देवाणघेवाण सोपी करणं इतका स्वच्छ होता, तर ही व्यवस्था सुरळीत सूरु राहावी, याची झळ सामान्य माणसाला बसू नये, अशी तरतूद का नाही केली? अशा पेमेंट व्यवस्थांसाठी दीर्घकालीन देखभाल असो की सायबर सुरक्षा असो, यासाठी पैसा लागणार; मग त्याची तरतूद अर्थसंकल्पात कायमस्वरूपी का नाही केली?, असा सवालही राज ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, काँग्रेस पक्षाने आरोप केला आहे की, सरकारने युपीआयबाबत घेतलेला निर्णय अमेरिकन सरकारच्या दबावाखाली घेतला आहे. मला त्याबद्दल माहीत नाही. पण हा निर्णय घेताना केंद्र सरकारने कोणाशी सल्लामसलत केली. परदेशी कार्ड कंपन्या आणि जागतिक पेमेंट व्यवस्था यांची अस्वस्थता नव्हती, असे सरकार ठाम सांगू शकेल? उत्तर नाही असे आहे. सरकारवर दबाव असेल, त्यांनी त्याचा फायदा स्वतःची तिजोरी भरून काढायला वापरला आहे, असा आरोपही राज ठाकरे यांनी केला आहे. केंद्र सरकारने यूपीआयसंदर्भात जारी केलेल्या नवीन नियमाचा आणि या एमडीआरचा महाराष्ट्र नवनिर्माण सेना निषेध नोंदवते. हे शुल्क भरण्यास व्यापाऱ्यांनी विरोध करावा, असे आवाहनही राज ठाकरे यांनी केले आहे.

----------------

### केतन अग्रवाल हत्या प्रकरण:पोलिसांकडून

पुराव्यांचा त्यामध्ये समावेश आहे. पोलिसांच्या तपासात केतन अग्रवाल, सिया गोयल आणि चेतन चौधरी यांच्यातील व्हॉट्सॲप चॅटिंग आणि फोन कॉल डिटेल्स () यांचाही अभ्यास करण्यात आला. या डिजिटल पुराव्यांसह वैद्यकीय अधिकाऱ्यांचे अहवाल, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब आणि सायबर व वैद्यकीय तज्ज्ञांचे जबाब आरोपपत्रात समाविष्ट करण्यात आल्याची माहिती आहे. पोलिसांनी विविध पुरावे एकत्र करून आरोपींविरोधात न्यायालयीन खटल्यासाठी आवश्यक कागदपत्रे सादर केली आहेत. आता न्यायालयाकडून या कागदपत्रांची छाननी केली जाणार आहे. आरोपपत्र दाखल झाल्यानंतर प्रकरणाच्या पुढील न्यायालयीन प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. न्यायालय आरोपपत्रातील कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर आरोपींवर औपचारिक आरोप निश्चित करण्याची प्रक्रिया होऊ शकते. त्यानंतर खटल्याच्या सुनावणीचा मार्ग मोकळा होईल. दरम्यान, सह-आरोपी चेतन चौधरीचे वकील ॲड. राम सहाणे यांनी न्यायालयात चार्जशीट दाखल झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. पोलिसांनी सादर केलेल्या आरोपपत्राचा कायदेशीर अभ्यास करून न्यायालयात आरोपीची बाजू मांडली जाईल, असे त्यांनी सांगितले.लोहगड किल्ल्याच्या दरीत केतन अग्रवाल याचा मृत्यू झाल्याच्या घटनेने मावळ तालुक्यासह पुणे जिल्ह्यात खळबळ उडाली होती. आता २५०० पानांच्या आरोपपत्रामुळे या प्रकरणाला महत्त्वाचे न्यायालयीन वळण मिळाले असून, पुढील सुनावणीत कोणते पुरावे समोर येतात याकडे लक्ष लागले आहे.

----------

### मॉन्सून परतीच्या

सांगली आणि सातारा येथे जोरदार पावसाचा इशारा आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, नाशिक घाटमाथा, नाशिक, अहिल्यानगर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, परभणी, लातूर, नांदेड, हिंगोली, बुलढाणा, वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली येथे विजांसह पाऊस होण्याची शक्यता आहे. मंगळवारी रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा घाटमाथा आणि कोल्हापूर घाटमाथ्यावर जोरदार पावसाचा इशारा आहे. ठाणे, रायगड, पुणे घाटमाथा, कोल्हापूर, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर, धाराशिव, लातूर आणि नांदेड येथे विजांसह पावसाची शक्यता आहे. मुंबई, पालघर, नाशिक घाटमाथा, नाशिक, अहिल्यानगर, बीड, परभणी आणि हिंगोली येथे विजांसह हलक्या सरी पडू शकतात. तर बुधवारी रत्नागिरी, सातारा घाटमाथा, कोल्हापूर घाटमाथा, नागपूर, गोंदिया आणि गडचिरोली येथे जोरदार पावसाचा अंदाज आहे. रायगड, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, लातूर, धाराशिव आणि नांदेड येथेही पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

------------

### तिरुपती लाडू प्रकरणी

क्ट' अंतर्गत असलेल्या विशेष न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.तब्बल ९६ कोटी रुपयांचे भेसळयुक्त तूप तयार केले. तिरुपती लाडू प्रसादासाठी वापरले जाणारे कथित भेसळयुक्त तूप हे रिफाइंड पाम तेल, पाम कर्नल ऑईल, पामोलिन आणि मोनोग्लिसराइड्स, मायव्हासेट सॉफ्ट ४०० व सिटिक सिड एस्टर्स यांसारख्या रसायने वापरून तयार केले गेले होते. हे उत्पादन नंतर 'अगमार्क स्पेशल ग्रेड गाईचे तूप' म्हणून पुरवले गेले. २०१९ ते २०२४ या काळात पुरवलेल्या या कथित बनावट तुपाचे मूल्य २३० कोटी रुपये होते आणि मंगलाने ९६ कोटी रुपयांचे भेसळयुक्त तूप तयार केले होते.

--------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. २० सप्टेंबर २०२६ ३

## थोडक्यात

### महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात

बीड । प्रतिनिधी

निजामशाहीच्या जुलमी राजवटीतून मराठवाड्याला मुक्त करण्यासाठी हजारो स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला संघर्ष, सोसलेल्या यातना आणि दिलेले बलिदान हा महाराष्ट्राच्या इतिहासातील अभिमानाचा आणि प्रेरणेचा अध्याय आहे. स्वातंत्र्य केवळ मिळवायचे नसते, तर त्यासाठी संघर्ष, त्याग आणि धैर्याची आवश्यकता असते, हा संदेश मराठवाडा मुक्ती संग्रामाने संपूर्ण पिढीला दिला. या गौरवशाली इतिहासाची प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी देशाच्या प्रगतीसाठी नवनवीन क्षेत्रांत यश संपादन करावे, असे आवाहन शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती सुदामतीताई वाघ यांनी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. या प्रसंगी ध्वजारोहण शिदोड गावचे प्रतिष्ठित नागरिक हरिभक्त परायण मसुराम तात्या कदम महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे संचालक नामदेवराव वाघ, रंजित बापू कदम दत्तात्रय चव्हाण, आत्माराम वाव्हळ, श्रीमती फाटे मॅडम आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन दीपप्रज्वलन आणि ध्वजपूजन करण्यात आले. त्यानंतर गावातील प्रतिष्ठित नागरिक तथा ह.भ.प. मसुराम तात्या कदम महाराज यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी राष्ट्रगीत व देशभक्तीपर वातावरणातून स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन केले. ध्वजारोहना नंतर मान्यवरांच्या सत्कार करण्यात आला.

शाळेतील विद्यार्थीनी कु. तसबीया शेख हिने देशभक्तीपर गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्या नंतर उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर मोलाचा संदेश दिला. या वेळी बोलताना ह.भ.प. मसुराम तात्या कदम महाराज यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामातील विविध ऐतिहासिक प्रसंग विद्यार्थ्यांसमोर मांडले. स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला संघर्ष, निजामशाहीविरुद्ध जनतेने उभारलेला लढा आणि १७ सप्टेंबर १९४८ रोजी झालेली मुक्ती यांचा संदर्भ देत त्यांनी विद्यार्थ्यां समोर

मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास मांडत या इतिहासातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना श्रीमती सुदामतीताई वाघ यांनी विद्यार्थ्यांना मराठवाडा मुक्ती संग्रामाचा लढा, क्रांतिवीरांनी केलेल्या चळवळी विद्यार्थ्यांना सांगितल्या तसेच यावेळी त्यांनी देशसेवेचा व शिक्षणाचा वसा पुढे नेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आत्माराम वाव्हळ सर यांनी केले कार्यक्रमाचे आभार दत्तात्रय चव्हाण यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती सानप मॅडम यांच्यासह शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. खाऊ वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### युसूफवडगांवची लेक स्नेहा थळकरीची महसूल सहाय्यकपदी निवड

युसूफवडगांव : केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकृष्ण थळकरी यांची कन्या कु. स्नेहा थळकरी हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या () परीक्षेतून महसूल सहाय्यक पदासाठी निवड झाली आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल युसूफवडगांव हायस्कूलच्या वतीने स्नेहा थळकरी तसेच तिचे वडील डॉ. श्रीकृष्ण थळकरी यांचा सत्कार करण्यात आला. सन २०२५ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत स्नेहा थळकरी हिने यश संपादन करत महसूल सहाय्यक पदासाठी आपली निवड निश्चित केली. ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने मेहनत, जिद्द आणि सातत्याच्या जोरावर मिळवलेल्या या यशाबद्दल युसूफवडगांव परिसरातून तिचे कौतुक होत आहे. स्नेहाच्या यशामुळे गावातील विद्यार्थ्यांनाही स्पर्धा परीक्षेची प्रेरणा मिळाली आहे. युसूफवडगांव हायस्कूलमध्ये आयोजित कार्यक्रमात प्राचार्य अंकुश भोसले सर यांच्या हस्ते स्नेहा थळकरी व तिचे पालक डॉ. श्रीकृष्ण थळकरी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी स्नेहाच्या यशाचे कौतुक करताना प्राचार्य भोसले यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून सातत्याने अभ्यास केल्यास स्पर्धा परीक्षेतही यश मिळवता येते, असे मत व्यक्त केले.

# वीस दिवसापासून मोकाट असणाऱ्या डॉ. महेंद्र पटवाला अटक करा

आष्टी । प्रतिनिधी

कडा शहरातील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल झालेल्या १९ वर्षीय तरुणीशी केबिन बंद करून अश्लील कृत्य करणारा आरोपी डॉक्टर महेंद्र पटवाला २० दिवस उलटूनही अटक न झाल्याने नागरिकांचा संताप अनावर झाला आहे. आरोपी डॉक्टरला तातडीने बेड्या ठोकण्याच्या मागणीसाठी शहरातील शेकडो संतप्त नागरिकांनी आज, शनिवारी (दि. १९) सकाळी कडा पोलीस चौकीत सुमारे दीड तास जोरदार ठिय्या आंदोलन केले. येत्या चार दिवसांत आरोपीला अटक न केल्यास कडा शहर बेमुदत बंद ठेवण्याचा आक्रमक पवित्रा नागरिकांनी घेतला आहे.



ग्रामस्थांचे कडा पोलीस चौकासमोर ठिय्या आंदोलन

आष्टी तालुक्यातील कडा येथील एका खाजगी रुग्णालयात ३० ऑगस्ट रोजी ही घटना घडली होती. उपचारासाठी आलेल्या भावी शिक्षिका असलेल्या १९ वर्षीय तरुणीला डॉ. महेंद्र पटवा याने केबिनमध्ये बोलावून, दरवाजा आतून बंद करत तिच्याशी अश्लील कृत्य केले होते. याप्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून आष्टी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४, ७५(१) आणि ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेनंतर झालेल्या मारहाणीत संबंधित डॉक्टर पटवाचा हात फ्रॅक्चर झाल्याने त्याच्यावर अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र, तब्बल २० दिवस उलटूनही आरोपीला अटक न झाल्याने शहरवासीयांमध्ये तीव्र असंतोष पसरला.

शनिवारी सकाळी १० ते ११:३० दरम्यान शेकडो नागरिकांनी पोलीस चौकीत ठिय्या मांडला. प्रशासनाने तात्काळ पावले उचलून आरोपीस गजाआड करावे, अशी मागणी करत चार दिवसांत कारवाई न झाल्यास कडा शहर बेमुदत बंद ठेवण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला. हे निवेदन परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे आणि कडा सहायक पोलीस निरीक्षक नाना सूर्यवंशी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

दरम्यान आंदोलकांची बाजू ऐकून घेत परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांनी जमावाला शांत केले. ''पुढील ४ ते ५ दिवसांत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आरोपीला गजाआड केले जाईल,'' असे ठोस आश्वासन पोलीस प्रशासनाने दिले. या आश्वासनानंतर नागरिकांनी आपले ठिय्या आंदोलन मागे घेतले. यावेळी सहायक पोलीस निरीक्षक नाना सूर्यवंशी, पोलीस हवालदार भाऊसाहेब आहेर, नंदकिशोर सवासे, अमोल नवले, गणेश भुतेकर, भारत गुजर, चंद्रमुनी बनसोडे, विकास जाधव, सद्दाम शेख, महिला अंमलदार मर्जीना शेख यांच्यासह होमगार्ड जवानांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## जय हनुमान तालमीच्या मल्लांचे घवघवीत यश

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथे पार पडलेल्या शालेय तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत जय हनुमान तालीमच्या १० युवा मल्लांनी दमदार कामगिरी करत आपल्या-आपल्या वजनगटात प्रथम क्रमांक पटकावला. ताकद, डावपेच, जिद्द आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर मिळवलेल्या या यशामुळे जय हनुमान तालमीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या स्पर्धेत भैरवनाथ हरिभाऊ तोडकर (३५ किलो), तेजस रवींद्र रंधवे (३८ किलो), कन्हैया लक्ष्मण गोल्हार (४४ किलो), रितेश बिभीषण गुजर (४५ किलो), ओम हनुमंत कडू (४८ किलो), कुणाल बिभीषण गुजर (४८ किलो), तुषार कैलास शिंदे (५१ किलो), गौरव संतोष सायकड (५५ किलो), शिवम अशोक परजणे (५७ किलो, शिरूर तालुका) आणि समर्थ परसराम भवर (६८ किलो) यांनी प्रतिस्पर्ध्यांवर मात करत प्रथम क्रमांक मिळवला.



**तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत १० पैलवानांचा प्रथम क्रमांक; जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी दिमाखात वाटचाल**

या उल्लेखनीय कामगिरीनंतर सर्व विजेत्या मल्लांचा, त्यांच्या पालकांचा तसेच जय हनुमान तालमीचे प्रशिक्षक प्रवीण दहिया व सहकाऱ्यांचा तालीमचे अध्यक्ष सतीश आबा शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विजेत्या पैलवानांना बीड येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

ग्रामीण भागातील युवा मल्लांना योग्य मार्गदर्शन, सरावाची शिस्त आणि व्यासपीठ उपलब्ध करून देत जय हनुमान तालीम कुस्तीची परंपरा जोपासत आहे. तालुकास्तरावर मिळालेले हे यश आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी मल्लांचा आत्मविश्वास वाढवणारे ठरले आहे.

आष्टीच्या मातीत घडणाऱ्या या युवा मल्लांनी जिल्हा, विभाग, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर आपल्या कुस्तीच्या कौशल्याचा ठसा उमटवावा आणि आष्टीच्या कुस्ती परंपरेचा गौरव अधिक उंचवावा, हीच अपेक्षा!

बीड जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी जय हनुमान तालमीच्या सर्व मल्लांना मनःपूर्वक शुभेच्छा..

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी महात्मा फुले भित्ती - विशेषांकाचे प्रकाशन पाटोद्याच्या जयभवानी महाविद्यालयाच्या 'मराठी विभागाचा' स्तुत्य उपक्रम

पाटोदा । प्रतिनिधी

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या पाटोदा येथील कला व विज्ञान महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून मराठी विभागाच्या वतीने महात्मा फुले यांच्या द्वि-जन्मशताब्दी निमित्त विशेष भित्तीपत्रकाचे प्रकाशन उत्साहात संपन्न झाले.

महात्मा फुले यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि वैचारिक कार्याची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी तसेच त्यांच्या विचारांचा जागर व्हावा, या उद्देशाने या भित्तीपत्रकाची निर्मिती करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम हे होते. माजी सैनिक श्री. तुळशीराम भाकरे हे यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. स्थानिक महाविद्यालय विकास समितीचे सदस्य श्री. दिलीपराव जाधव व श्री. बप्पासाहेब जाधव यांच्यासह पत्रकार श्री. विजय जाधव आणि प्राचार्य प्रोफेसर डॉ. सदाशिव सरकटे यांचीही यावेळी प्रमुख उपस्थिती होती. महात्मा फुले यांच्या द्वि-जन्मशताब्दी निमित्त आयोजित या उपक्रमामागे विद्यार्थ्यांमध्ये इतिहास, समाजसुधारणा आणि परिवर्तनवादी विचारांची जाणीव निर्माण करण्याचा उद्देश होता.




मराठवाड्याच्या मुक्तीसाठी योगदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करताना महात्मा फुले यांच्या समतावादी आणि शिक्षणविषयक विचारांचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले.

या भित्ति - विशेषांकासाठी प्रा. बापू घोक्षे यांनी मार्गदर्शक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रामकृष्ण प्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभागाच्या विद्यार्थी संपादक मंडळाने या भित्ति-विशेषांकाचे संपादन केले आहे. विद्यार्थी संपादक मंडळामध्ये आकांक्षा मकाळ, राणी मुंडे, महादेव वाघमारे, सागर शिंदे आणि रमेश सुळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन थोर समाजसुधारकांचे विचार आत्मसात करावेत, असे आवाहन केले. भित्तीपत्रकाच्या माध्यमातून महात्मा फुले यांच्या कार्याचा परिचय विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास, स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान आणि महात्मा फुले यांचे सामाजिक परिवर्तनाचे कार्य यांचा संगम घडून आला. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी जिज्ञासा आणि सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण करण्यास हा उपक्रम उपयुक्त ठरला. मराठी विभागाच्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि संशोधनात्मक दृष्टिकोनाला चालना देणारे असे उपक्रम भविष्यातही आयोजित करण्यात यावेत, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुनील जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अशोक देवगुडे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. प्रकाश नाईकवाडे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरिक व प्राध्यापक- कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## विना वाद्य बाप्पाचे विसर्जन; फोटोग्राफर संघटनेची गांधीगिरी बँजोला परवानगी नाकारल्याने काळ्या फिती लावून मूक निषेध




आष्टी (प्रतिनिधी) : गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीत बँजो व साऊंड सिस्टीमला परवानगी नाकारण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर आष्टी तालुका फोटोग्राफर संघटनेने अनोख्या पद्धतीने 'गांधीगिरी' करत प्रशासनाचे लक्ष वेधले. संघटनेचे पदाधिकारी व सदस्य काळे कपडे परिधान करून, तोंडाला काळ्या फिती बांधून आणि हातात ध्वनी क्षेपकाचे संदेश देणारे फलक ज्यामध्ये 'रिकामा ढोल पण भावना भरपूर, वाद्यांना परवानगी नाही म्हणून यंदाची मिरवणूक शांत,ढोल शांत पण भक्ती नाही,आवाज शून्य पण भावना शंभर टक्के,या आशयाचे हातात फलक घेऊन विना वाद्य गणरायाच्या विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाले.

गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीत ढोल-ताशे, बँजो आदी वाद्यांमुळे दरवर्षी उत्साहाचे वातावरण निर्माण होत असते. मात्र यंदा बँजो पथकाला परवानगी देताना प्रशासनाने किचकट नियमावली घालून दिल्याचे सांगत तेवढे तरी वाद्य कशासाठी वाजवायचे असे फोटोग्राफर संघटनेने मत व्यक्त केले.शिवाय या निर्णयामुळे सर्व वाद्य कलावंत व गणेश मंडळांमध्ये तीव्र चिड आणि नाराजी निर्माण झाल्याची भावना मनात असल्याचे देखील आष्टी शहरातील मंडळांच्या सदस्यांनी सांगितले. याच पार्श्वभूमीवर फोटोग्राफर संघटनेने कोणतेही वाद्य न वाजवता शांततेच्या मार्गाने गांधीगिरी करत गणरायाचे मनोभावे पूजन करत विसर्जन केले.

तोंडाला काळ्या पट्ट्या बांधून सदस्यांनी कोणतीही घोषणाबाजी न करता केवळ भक्तिभावाने गणरायाचे विसर्जन केले. 'विरोध आहे, मात्र उत्सवाच्या शांततेला धक्का नको', असा संदेश या रॅलीच्या माध्यमातून यावेळी दिसून आला.

प्रशासनाने उत्सवाची परंपरा, नागरिकांच्या भावना तसेच कलाकार व संबंधित व्यावसायिकांच्या अडचणींचा विचार करून वाद्यांबाबतच्या नियमांचा फेरविचार करावा, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली. काळ्या फिती बांधून शांततेत केलेल्या या गांधीगिरीची शहरात दिवसभर चर्चा होती.

## बीडमध्ये पहिल्यांदाच सामूहिक श्री गणपती अथर्वशीर्ष पठण सोहळा

### ४० मंडळातील ५०० हून अधिक महिलांचा असणार सहभाग

बीड । प्रतिनिधी

गणेशोत्सवाचे औचित्य साधून बीड शहरात प्रथमच अत्यंत दिमाखदार आणि अभूतपूर्व अशा 'सामूहिक श्री गणपती अथर्वशीर्ष पठण' सोहळ्याचे आयोजन आज करण्यात आले आहे. जानकीराम हिंदूरक्षा समिती, बीड आणि रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने हा भव्य धार्मिक उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. बीड शहरात प्रथमच अशा प्रकारच्या भव्य सामूहिक पठणाचे आयोजन केले जात असून, यात सुमारे ५०० हून अधिक महिला एकाच स्वरात आणि एकाच वेळी अथर्वशीर्ष पठण करणार आहेत.



हा सोहळा आज रविवार रोजी सायंकाळी ०५:३० वाजता सहयोग नगर येथील श्री सर्वेश्वर गणपती मंदिर परिसरात पार पडणार आहे. ''एक स्वर - एक संघटन - एक प्रार्थना'' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात शहरातील विविध ४० सामाजिक, धार्मिक आणि महिला मंडळांचा सक्रिय सहभाग लाभणार आहे. यामध्ये प्रामुख्याने महिलांचा ढोल ताशा ग्रुप,टाळ नृत्य ग्रुप,योगा ग्रुप, पारायण ग्रुप,भजन ग्रुप, मंगळागौर ग्रुप, गरबा ग्रुप, संस्कार वर्ग ग्रुप, गृहिणी ग्रुप आणि व्यावसायिक महिला ग्रुप यांसह अनेक नामांकित संस्थांच्या महिला प्रतिनिधी व सदस्य सहभागी होणार आहेत.

बीड शहरातील महिलांमध्ये धार्मिक संस्कृती आणि सामूहिक ऊर्जेचा जागर करण्यासाठी हा उपक्रम मोलाचा ठरणार आहे. सोहळा वेळेवर सुरू होणार असल्याने शहरातील सर्व महिला व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

पान ६ वरून...

### पर्यावरणपूरक सजावटीतून

या सजावटीत केवळ देखावा नाही तर चार सामाजिक देखावे जिवंत करण्यात आले आहेत. चार गौरींना चार वेगवेगळ्या रूपात दाखवून नव्या पिढीला जुनी संस्कृती काढावी यासाठी देखावे बनवण्यात आले आहेत, जे आपल्या भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवते. यातील दळण निवडणारी गौरी ही सुपात धान्य निवडताना दाखवली आहे, जी काटकसर आणि शुद्धतेचे प्रतीक आहे. तर जात्यावर दळण दळणारी गौरी ही जुन्या काळातील जाते-खुंटा वापरून दळण दळताना दाखवले आहे, जो स्वावलंबनाचा संदेश देतो. मातीच्या चुलीवर केटलीत चहा बनवतानाचे दृश्य, जे एकत्र कुटुंब पद्धतीची आठवण करून देते. मंथनातून लोणी काढणारी गौरी ही रवीने दही घुसळून लोणी काढतानाचे दृश्य, सात्विकता आणि कष्टकरी जीवनाचे दर्शन घडवते. संपूर्ण सजावट ही जाते, सुप, रवी, मातीचे मडके, चूल, केटली आणि नैसर्गिक शेतमालापासून तयार करण्यात आली असून, यात प्लास्टिकचा कुठेही वापर केलेला नाही.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

आलेल्या पाठपुराव्यामुळे मुख्यमंत्री सहायता निधीतून एकूण ३ लाख रुपयांची मदत मंजूर झाली आहे. विशेषतः नवजात व जुळ्या बाळांच्या उपचारासाठी आर्थिक मदत मंजूर झाल्याने संबंधित कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. गरजू रुग्णांना गंभीर आजार किंवा उपचाराच्या काळात आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागू नये, यासाठी मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य दिले जाते. या योजनेचा लाभ मतदारसंघातील गरजू रुग्णांना मिळवून देण्यासाठी आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला जात असल्याचे या प्रकरणांतून दिसून येते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून मिळणाऱ्या मुख्यमंत्री सहायता निधीचा लाभ आष्टी विधानसभा मतदारसंघातील गरजू रुग्णांपर्यंत पोहोचविण्यासाठी आ.सुरेश धस यांच्या माध्यमातून करण्यात येत असलेल्या पाठपुराव्यामुळे अनेक कुटुंबांना उपचाराच्या काळात आर्थिक आधार मिळत आहे. या रुग्णांना आमदार सुरेश धस यांचे ऑफिसमधून रुग्णसेवक अमर वाळके, विकास साळवे, शरद रेडेकर यांनी मदत केली.

### रात्री ७ वाजता 'भोंगा'

घरातील टी.व्ही,मोबाईल बंद करून आपल्या पाल्यांना दोन तास अभ्यासासाठी बसवावे व मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देऊन त्यांच्याकडून नियमित अभ्यासाचा सराव करून घेण्याचे ग्रामपंचायतीच्या वतीने आवाहन केले आहे.मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी दररोज रात्री ७ ते ९ या वेळेत दोन तास अभ्यासासाठी देणे अत्यंत महत्त्वाचे आहे,यातच खरी प्रगती व विद्यार्थ्यांचे भवितव्य अवलंबून आहे.ग्रामपंचायतने विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या या प्रगतशील उपक्रमाला ग्रामस्थ, पालक व विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद लाभत आहे.या उपक्रमाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.हा उपक्रम यशस्वी राबविण्याचा सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

### माजलगावात मराठवाड्याचा

रामकृष्ण खटावकर उपस्थित राहणार आहेत. या माध्यमातून स्थानिक स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास आणि महाराष्ट्राच्या ऐतिहासिक शस्त्रपरंपरेचा वारसा नव्या पिढीसमोर प्रत्यक्ष स्वरूपात मांडला जाणार आहे.

या क्रांतिकारकांच्या इतिहासामागे इतिहास संशोधक रवींद्र भाऊसाहेब जगदाळे यांचे संशोधन व लेखन असून, या संशोधनावर आधारित पुस्तकही लवकरच प्रकाशित करण्यात येणार आहे. लोकनेते स्व. सुंदररावजी सोळंके यांच्या स्मृतीला अभिवादन करत त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या उपक्रमातून स्थानिक इतिहासाचे दस्तऐवजीकरण आणि पुढील पिढीपर्यंत त्याचे जतन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. वीरेंद्र दादा सोळंके व जयसिंगभैय्या सोळंके यांच्या विनंतीने आयोजित या उपक्रमासह सिंदफणा पब्लिक स्कूल, लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि., सुंदररावजी सोळंके नागरी सहकारी पतसंस्था मर्या., जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी अँड नर्सिंग, कानिफनाथ माध्यमिक विद्यालय मोहखेड, सुंदररावजी सोळंके महाविद्यालय, रत्न सुंदर अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी, माजलगाव मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था मर्या. आणि माजलगाव विकास प्रतिष्ठान आदी संस्थांचा सहभाग आहे. माजलगावच्या या गौरवशाली इतिहासाला साक्षी राहण्यासाठी विद्यार्थी, नागरिक, इतिहासप्रेमी व संशोधकांनी २१-२२ सप्टेंबर रोजी प्रदर्शनाला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन माजलगाव मतदार संघाचे भाग्यविधाते आमदार प्रकाश दादा सोळंके करत आहे

### टी.सी.हरवला आहे

नाव. विलास सखाराम काळे रा. ठाकर आडगाव, तालुका गेवराई, जिल्हा बीड, मो.८६९८५२६२५१. इयत्ता आठवी चा टी सी गेवराई जातेगाव प्रवासात हरवला आहे, कोणाला सापडल्यास वरील नंबर वर संपर्क साधावा.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट भरीव आर्थिक मदत द्या!


## भारत कृषक समाजाने (महाराष्ट्र) केंद्र व राज्य शासनाकडे केली मागणी

पुणे : ऑगस्ट, सप्टेंबरमध्ये पावसाने घेतलेल्या प्रदीर्घ विश्रांतीमुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, त्यानंतर झालेल्या पावसानेही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली नाही. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पंचनाम्याच्या प्रक्रियेत न अडकवता सरसकट भरीव आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी भारत कृषक समाजाने (महाराष्ट्र) केंद्र व राज्य शासनाकडे केली आहे.

याबाबत मुख्यमंत्री, केंद्रीय कृषिमंत्री व इतरांना निवेदने पाठविली. निवेदनात म्हटले, की खरीप हंगामाच्या सुरुवातीला पिकांची परिस्थिती चांगली होती. मात्र ऑगस्टमध्ये पावसाने प्रदीर्घ दांडी मारल्याने सोयाबीनसह विविध पिकांचे मोठे नुकसान झाले. त्यानंतर काही भागांत कमी-अधिक प्रमाणात पाऊस झाला असला, तरी ७० टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या पिकांना त्यातून फारसा दिलासा मिळालेला नाही. पावसानंतर पडलेल्या कडक उन्हामुळे पिकांचे नुकसान आणखी वाढण्याची शक्यता असल्याचे संघटनेने म्हटले आहे. यंदा पीकविमा योजनेच्या धोरणामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पीकविमा काढलेला नाही. त्यामुळे शासनाने पंचनाम्याच्या प्रक्रियेत वेळ न घालवता नुकसानग्रस्त सर्व शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत जाहीर करावी. तसेच केंद्र शासनाचे पीक नुकसान पाहणी करणारे पथक तातडीने राज्यात बोलवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. शासनाकडून आर्थिक मदत तसेच पीकविमा कंपन्यांकडून नुकसानभरपाई मिळण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी भारत कृषक समाजाच्या वतीने चेअरमन डॉ. प्रकाश मानकर, डॉ. रमेश ठाकरे, प्रशांत चौधरी, वसंतराव महाजन, जगतराव पाटील आणि शेषराव पाटील यांनी केली आहे.



## आकर्षक सूरवंट पिकांसाठी धोकादायक



पावसाळा म्हटला की निसर्ग रंगीबेरंगी फुलांनी, झाडांनी आणि विविध कीटकांनी बहरतो. अशाच दिवसांत एक आकर्षक सुरवंट नुकताच आढळून आला आहे. हा दिसायला आकर्षक, रंगबेरंगी आहे मात्र पिकांसाठी तेवढाच धोकादायक आहे. यासाठी शेतकऱ्यांनी याची काळजी घेतली पाहिजे. हिरव्या, निळ्या, पिवळ्या आणि नारंगी छटांनी सजलेला हा सुरवंट स्थानिकांच्या उत्सुकतेचा विषय ठरतो. परंतु कीटकशास्त्रज्ञांच्या मते हा सुंदर दिसणारा सुरवंट प्रत्यक्षात धोकादायक असून त्याला नेटल सुरवंट किंवा स्लग मॉथ सुरवंट म्हणून ओळखले जाते. मागील वर्षी परतीच्या पावसावेळी काही पिकात ह्या अळीचा प्रादुर्भाव झालेला दिसून आला आहे. शेतकऱ्यांनी या अळीच्या संपर्कापासून दूर राहावे.

काय आहे नेटल सुरवंट?

हा एक प्रकारचा पतंगाचा सुरवंट आहे. याच्या अंगावर असलेले काटेरी केस फक्त सजावटीसारखे नसून त्यात सूक्ष्म प्रमाणात विषारी द्रव असते. तो याचा वापर स्वसंरक्षणासाठी करतो. काही ठिकाणी याला घोणस अळी संबोधले जाते. वैज्ञानिक भाषेत पॅरासा लेपिडा किंवा स्लग माँथ कॅटरपिलर म्हणून नोंद आहे. भारतासह आशियातील काही उष्णकटिबंधीय प्रदेशांत व महाराष्ट्रातही अधूनमधून त्याचे दर्शन घडते.

का आहे धोकादायक? : अळीने सोडलेले रसायन त्वचेच्या संपर्कात आल्यास त्वचेवर चट्टे पडून अग्नी दाह होतो. ही अळी माणसाच्या अंगावर किंवा माणसाच्या दिशेने येत नाही. त्याचप्रमाणे या आळीच्या संपर्कात आपली त्वचा आल्यासच अग्नीदाह होत असतो, तो शक्यतो सौम्य असतो. ज्या व्यक्तींना अलर्जी आहे किंवा दम्याचा त्रास आहे त्या व्यक्तीमध्ये मात्र तीव्र स्वरूपाची लक्षणे आपणास पहावयाला मिळू शकतात. या सुरवंटाच्या अंगावरील काट्यांचा स्पर्श झाल्यास तीव्र वेदना, जळजळ, खाज येते. काही वेळा त्वचेवर लाल चट्टे किंवा फोड उठतात. विशेषतः ॲलर्जी असणाऱ्यांसाठी त्याचा दंश अधिक त्रासदायक ठरू शकतो.

अशी घ्या काळजी : सुरवंट दिसल्यास त्याच्यापासून अंतर ठेवा. मुलांना त्याला स्पर्श करू न देण्याबाबत सावध करा. अपघाती स्पर्श झाल्यास चिकट टेप त्वचेवर लावून काटे काढावेत व भाग साबणाच्या पाण्याने धुवावा. बर्फ चोळल्याने जळजळ कमी होऊ शकते. त्रास वाढल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

## मत्स्यपालनासाठी जाणून घ्या किफायतशीर मार्ग

काही माशांच्या प्रजाती इतरांपेक्षा अधिक किफायतशीर आणि पालन करणे सोपे असते, ज्यामुळे त्या बजेट-अनुकूल ऑपरेशन्ससाठी आदर्श बनतात.

तिलापिया : तिलापिया त्यांच्या टिकाऊपणासाठी आणि विविध पर्यावरणीय परिस्थितीत वाढण्याची क्षमता यासाठी ओळखले जातात. त्यांचे पालन करणे तुलनेने सोपे आहे आणि त्यांच्या सौम्य चवीच्या पांढऱ्या मांसामुळे ते मत्स्यपालनात लोकप्रिय आहेत.

कॅटफिश : कॅटफिश, विशेषतः चॅनेल कॅटफिश सारख्या प्रजाती, मत्स्यपालनासाठी योग्य आहेत. त्यांची भूक तीव्र असते, ते लवकर वाढतात आणि वेगवेगळ्या पाण्याच्या परिस्थितीशी जुळवून घेतात. विशेषतः चॅनेल कॅटफिशची मागणी जास्त असल्याने अनेक प्रदेशांमध्ये मोठ्या प्रमाणात शेती केली जाते.

कार्प : सामान्य कार्प आणि त्याच्या विविध जाती, जसे की ग्रास कार्प आणि सिल्व्हर कार्प, हे किफायतशीर मत्स्यपालनासाठी लोकप्रिय पर्याय आहेत. कार्प त्यांच्या लवचिकता, कमी दर्जाच्या पाण्यात वाढण्याची क्षमता आणि कार्यक्षम खाद्य रूपांतरणासाठी ओळखले जातात.ट्राउट : रेनबो ट्राउट आणि इतर ट्राउट प्रजाती कमी बजेटच्या माशांच्या शेतीसाठी योग्य असू शकतात, विशेषतः थंड पाण्याच्या वातावरणात.

तिलापिया हायब्रिड : तिलापिया हायब्रिड सारख्या हायब्रिड तिलापियाची पैदास त्यांच्या जलद वाढीसाठी आणि रोग प्रतिकारशक्तीसाठी केली जाते.

तलावाची डिझाइन आणि बांधकामाची मूलभूत माहिती : मुख्य पायरी म्हणजे तुमच्या तलावासाठी योग्य जागा निवडणे असते. पाण्याच्या स्त्रोतांची उपलब्धता आणि योग्य निचरा होणारा परिसर आदर्श आहे. पुढे, तुम्ही ज्या प्रजातींची शेती करण्याची योजना आखत आहात त्यानुसार तलावाचा आकार विचारात घ्या. तलावाची खोली योग्य ऑक्सिजन परिसंचरण आणि तापमान नियमन करण्यास अनुमती देते याची खात्री करा. योग्य बांधकाम तंत्रांमध्ये माती कॉम्पॅक्ट करणे, आवश्यक असल्यास तलावाचे अस्तरीकरण करणे आणि पाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी इनलेट आणि आउटलेट पाईप्स बसवणे समाविष्ट आहे. पाण्याची गुणवत्ता राखताना गळती रोखणे आवश्यक आहे. तलावाभोवती असलेल्या वनस्पतींसारखे नैसर्गिक घटक तुमच्या माशांना सावली आणि निवारा देऊ शकतात. याव्यतिरिक्त, वायुवीजन प्रणाली लागू केल्याने पाण्यात ऑक्सिजनची पातळी सुधारू शकते.पाण्याची गुणवत्ता व्यवस्थापन : तुमच्या तलावातील पाणी स्वच्छ आणि संतुलित आहे याची खात्री केल्याने रोगांचा प्रादुर्भाव रोखता येतो आणि माशांच्या वाढीचा दर वाढतो. निरोगी जलीय वातावरण राखण्यासाठी ऑक्सिजन पातळी, पीएच, तापमान आणि अमोनिया सांद्रता यासारख्या पॅरामीटर्सचे निरीक्षण करणे महत्त्वाचे आहे. परवडणाऱ्या चाचणी किटचा वापर करून पाण्याच्या गुणवत्तेची नियमितपणे चाचणी केल्याने संभाव्य समस्यांबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी मिळू शकते.




## झाडावरील केळीचे घड पिशवीने झाकण्यामुळे होतात आश्चर्यकारक फायदे!

केळी उत्पादक शेतकरी केळीचे घड पिशव्यांनी झाकतात ही एक सामान्य कृषी पद्धत आहे ज्यामुळे फळांचे विविध पर्यावरणीय घटक, कीटक आणि रोगांपासून संरक्षण होते. सामान्यतः या पिशव्या पॉलिथिन, न विणलेले फॅब्रिक किंवा कागदासारख्या सामग्रीपासून बनविलेल्या असतात. केळीचे घड पिशव्यांमध्ये पॅक केल्याने अनेक फायदे मिळतात. आधुनिक केळी शेतीमध्ये ही एक आवश्यक क्रिया आहे. केळीचे घड पिशवीने झाकण्याचे अनेक फायदे आहेत.

कीटक आणि रोगांपासून संरक्षण :

केळीचे घड पिशवीत ठेवण्याचे मुख्य फायदे म्हणजे ते विविध कीटक आणि रोगांपासून संरक्षण प्रदान करते. फुलकिडी, फळमाशी आणि इतर कीटक यांसारख्या कीटकांमुळे केळीच्या फळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते, ज्यामुळे चट्टे, डाग आणि इतर गुणवत्तेच्या समस्या निर्माण होतात. तसेच या किडी आणि रोगांना पिशव्या अडथळा म्हणून काम करतात, ज्यामुळे या कीटकांना फळांपर्यंत पोहोचण्यापासून प्रतिबंध होतो. आर्द्र वातावरणात जेथे करपा आणि सिगार रॉट सारख्या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होतो. बॅगिंगमुळे एक सूक्ष्म वातावरण तयार होते जे फळांच्या पृष्ठभागाशी ओलावा कमी करते, ज्यामुळे अशा रोगांचे प्रमाण कमी होते. यामुळे रासायनिक कीटकनाशकांची गरज कमी होते, त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण होते. सुरक्षित, कीटकनाशकमुक्त फळ उत्पादित होते. याव्यतिरिक्त, पावसाळ्यात फळांना पिशव्या मातीच्या कणांपासून दूषित होण्यास प्रतिबंध होते.

फळांची चांगली गुणवत्ता : केळीची गुणवत्ता वाढवण्यात बॅगिंग महत्त्वाची भूमिका बजावते.



पिशव्या धूळ, घाण आणि यांत्रिक नुकसान यासारख्या बाह्य घटकांपासून फळांचे संरक्षण करतात. परिणामस्वरुप, केळी गुळगुळीत त्वचेसह एकसमान आकार विकसित करतात, त्यावर कोणतीही खूण किंवा डाग नसतात. निर्यातक्षम केळीसाठी हे अतिशय महत्त्वाचे आहे. केळीची गुणवत्ता हा बाजारभावाचा एक महत्त्वाचा निर्धारक आहे. याव्यतिरिक्त, पिशव्या सूर्य प्रकाशामुळे होणारी सन बर्निंग कमी करण्यास मदत करते, थेट सूर्यप्रकाशापासून फळांचे संरक्षण करून, बॅगिंग केळीचा नैसर्गिक रंग टिकवून ठेवते, ज्यामुळे ग्राहक आकर्षित होतात. त्यामुळे शेतकर्यांना बाजारात जास्त भाव आणि अधिक नफा मिळतो.

फळांची चांगली वाढ आणि परिपक्वता : केळीचे घड पिशव्यांमध्ये पॅक केल्याने फळांच्या सभोवतालच्या सूक्ष्म वातावरणावर सकारात्मक परिणाम होतो, ज्यामुळे फळांची वाढ, आकार आणि परिपक्वता चांगली राहते. पिशव्या फळांच्या सभोवतालच्या ओलाव्याची योग्य पातळी राखण्यास मदत करतात, जे फळ भरण्यासाठी आणि विकासासाठी आवश्यक आहे. हे नियंत्रित वातावरण फळांचे वजन आणि आकार सुधारू शकते, ज्यामुळे प्रति घड जास्त उत्पादन मिळते. शिवाय, बॅगिंगमुळे केळी मजबूत होतात आणि त्यांचे शेल्फ लाइफ वाढते, जे स्थानिक बाजारपेठ आणि निर्यात दोन्हीसाठी फायदेशीर आहे.

काढणी नंतरचे नुकसान कमी करणे : काढणीनंतर, विशेषतः हाताळणी, वाहतूक आणि साठवण दरम्यान केळीचे लक्षणीय नुकसान होते. कापणीपूर्व अवस्थेत बॅगिंगमुळे संरक्षणाचा अतिरिक्त थर देऊन हे नुकसान कमी करण्यात मदत होते. फळांचा दर्जा चांगला आणि नुकसानीचा प्रादुर्भाव कमी होतो. म्हणजे पॅकिंग अवस्थेत आणि वाहतुकीदरम्यान कमी फळे खराब होतात. याव्यतिरिक्त, बॅगिंगमुळे पिशव्या फळांमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यास मदत करतात. त्यामुळे फळांचे वजन कमी होत नाही. उच्च तापमान असलेल्या भागात किंवा कोरड्या हंगामात जेव्हा निर्जलीकरणाचा धोका जास्त असतो तेव्हा हे विशेषतः महत्त्वाचे आहे.

पर्यावरणास अनुकूल : कीटकनाशकांच्या अति वापरासाठी बॅगिंग हा पर्यावरण पूरक पर्याय आहे. रासायनिक हस्तक्षेपाची गरज कमी करून, ही पद्धत केळीच्या टिकाऊ उत्पादनात योगदान देते. हे सेंद्रिय आणि कीटकनाशक-मुक्त उत्पादनासाठी देते. बायोडिग्रेडेबल किंवा पुन्हा वापरता येण्याजोग्या पिशव्या वापरल्याने टिकाऊपणा आणखी वाढते, ज्यामुळे पर्यावरणीय प्रभाव कमी होतो.

खर्चात बचत : पिशव्यांमधील सुरुवातीची गुंतवणूक अतिरिक्त खर्चासारखी वाटत असली तरी कीटकनाशके, फळांचा दर्जा आणि उच्च बाजारभाव या दृष्टीने दीर्घकालीन फायदे बॅगिंगला किफायतशीर पर्याय बनवतात. उत्पादनात वाढ आणि काढणी नंतरच्या नुकसानीतील घट यामुळे बॅगिंगची गुंतवणूक अधिक योग्य वाटते.

हवामानास अनुकूल : अतिवृष्टी किंवा जोरदार वारा यांसारख्या परिस्थितीत, बॅगिंगमुळे फळांच्या घडांना अतिरिक्त संरक्षण मिळते. पिशव्या गारपीट, मुसळधार पाऊस आणि काही बाबतीत पानांमुळे होणारे नुकसान कमी करण्यास मदत करतात. यामुळे हवामानातील बदलांशी जुळवून घेण्यासाठी आणि बदलत्या हवामानाच्या पद्धती असूनही सातत्यपूर्ण उत्पादन सुनिश्चित करण्यासाठी बॅगिंग हा एक मौल्यवान उपाय आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६३३ : पृथ्वी सूर्याभोवती फिरत असल्याचे प्रतिपादन केल्याबद्दल गॅलिलिओ यांच्यावर खटला चालवण्यात आला.
१८५७ : चा राष्ट्रीय उठाव ब्रिटिश (ईस्ट इंडिया कंपनीच्या) सैन्याने दिल्ली परत ताब्यात घेतली.
१८७८ : भारतातील सर्वाधिक प्रचलित इंग्रजी भाषिक वृत्तपत्र द हिंदूचे प्रकाशन साप्ताहिक वृत्तपत्राच्या रूपाने सुरु करण्यात आले.
१९१३ : वीर वामनराव जोशी यांच्या 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' या नाटकाचा पहिला प्रयोग मुंबईत झाला.
१९४६ : पहिले कान्स फिल्म फेस्टिव्हल आयोजित केले गेले.
१९७३ : बॅटल ऑफ सेक्सेस ह्यूस्टन, टेक्सास येथे बिली जीन किंग या महिलेने बॉबी रिग्ज या पुरूषाचा लॉन टेनिसमधे पराभव केला.
१९७७ : व्हिएतनामचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.
२००१ : अमेरिकेने दहशतवादाविरुद्ध युद्ध पुकारले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५३ : चुलालोंगकोर्ण तथा राम (पाचवा) थायलँडचा राजा (मृत्यू: २३ आक्टोबर १९१०)
१८५६ : साली भारतातील आध्यात्मिक नेते आणि समाजसुधारक नारायण गुरु यांचा जन्मदिन.
१८९७ : नारायण भिकाजी तथा 'नानासाहेब' परुळेकर 'सकाळ' वृत्तपत्राचे संस्थापक संपादक, प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाचे अध्यक्ष व भारतीय पत्रकारितेचे पितामह, स्वच्छ समाजदृष्टी, उक्ती व कृती यातील करडी शिस्त या असाधारण गुणांमुळे नानासाहेब परुळेकर हे स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी पत्रकारितेतील सदैव स्मरणात रहावे, असे व्यक्तिमत्त्व ठरले. त्यांना पद्मभूषण सन्मानाने गौरविण्यात आले होते. 'निरोप घेता' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. (मृत्यू: ८ जानेवारी १९७३)
१९०९ : गुलाबदास हरजीवनदास ब्रोकर गुजराती लेखक व समीक्षक, पद्मश्री (१९९१), गुजराती साहित्य परिषदेचे अध्यक्ष, गुजरातीतील मनोविश्लेषणात्मक कथेची सुरुवात करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते. (मृत्यू: १० जून १९०६ पुणे)
१९११ : भारतीय तत्त्वज्ञानी आणि कार्यकर्ते श्रीराम शर्मा यांचा जन्म (मृत्यू: २ जून १९९०)
१९२१ : क्रिकेटपटू पनानमल पंजाबी यांचा जन्म.
१९२२ : द. न. गोखले चरित्र वाङ्मयाचे गाढे संशोधक, मराठी शुद्धलेखनाचे अभ्यासक, पुणे विद्यापीठाने त्यांना डी. लिट पदवी देऊन गौरविले होते.
१९२३ : भारतीय अभिनेते आणि निर्माते अक्किनेनी नागेश्वर राव यांचा जन्म (मृत्यू: २२ जानेवारी २०१४)
१९२५ : आनंद महिडोल तथा राम (सातवा) थायलँडचा राजा (मृत्यू: ९ जून १९४६)
१९३४ : भारतीय व्यंगचित्रकार आणि पत्रकार राजिंदर पुरी यांचा जन्म. (मृत्यू: १६ फेब्रुवारी २०१५)
१९४४ : क्रिकेटपटू रमेश सक्सेना यांचा जन्म.
१९४६ : भारतीय वकील आणि न्यायमूर्ती मार्कंडेय काटजू यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३३८ : दिल्ली येथील तुघलक वंशीय सत्तेचे सम्राट शासक फिरोज शाह तुगलक तृतीय यांचे निधन.
१८१० : मीर तकी मीर ऊर्दू शायर (जन्म: १७२३)
१९१५ : संत गुलाबराव महाराज (जन्म: ६ जुलै १८८१)
१९२७ : पॅन-इस्लामिक चळवळीबद्दल सहानुभूती असलेले भारतीय क्रांतिकारक अब्दुल हाफिज मोहम्मद बराकतउल्ला यांचे निधन.
१९२८ : केरळमधील समाजसुधारक नारायण गुरू यांचे निधन.
१९३३ : ॲनी बेझंट थिऑसॉफिस्ट, सामाजिक कार्यकर्त्या व भारतीय स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या, त्यांनी हिंदू धर्म व संस्कृतीचे सखोल अध्ययन केले होते. त्यांनी भगवद्गीतेचे इंग्रजीत भाषांतर केले होते. त्यांची ग्रंथसंख्या सुमारे ४५० इतकी आहे. १९१६ मध्ये त्यांनी 'होमरुल लीग'ची स्थापना केली. (जन्म: १ आक्टोबर १८४७)
१९४२ : भारत छोडो आंदोलनाच्या वेळेला राष्ट्रध्वज घेऊन निघालेल्या मिरवणुकीचे नेतृत्व करीत असतांना केलेल्या गोळीबारात थोर भारतीय क्रांतिकारक महिला कनकलता बरुआ यांचे निधन झाले.
१९७९ : चेकोस्लोव्हेकियाचे राष्ट्राध्यक्ष लुडविक स्वोबोदा यांचे निधन.
१९९६ : कवी, कथाकार, सामिक्षक, विचारवंत दगडू मारुती पवार उर्फ दया यांचे निधन.
१९९७ : कल्याण कुमार गांगुली तथा अनुप कुमार चित्रपट अभिनेते (मृत्यू: ९ जानेवारी १९२६ खांडवा, मध्य प्रदेश)
२०१२ : प्रख्यात भारतीय नाट्य दिग्दर्शक, रंगमंच, दूरदर्शन आणि हिंदी चित्रपट अभिनेते दिनेश ठाकूर यांचे निधन.
२०१५ : भारतीय उद्योजक जगमोहन दालमिया यांचे निधन. (जन्म: ३० मे १९४०)

## गाई-म्हशींच्या नवीन जातीचे संगोपन

आपल्या देशात शेती आणि पशुपालनाची परंपरा खूप जुनी आहे. येथे शेतकरी शेतीसोबतच पशुपालन करून अधिक पैसे कमवू शकतात. त्यामुळेच गाई-म्हशींच्या नवीन जातीचे संगोपन करून त्यांचे दूध विकले जात आहे. गाई आणि म्हशींच्या अनेक प्रजाती जास्त दूध देतात. या जाती डेअरी उद्योगासाठी खूप चांगल्या आहेत.

आपल्या देशात शेती आणि पशुपालनाची परंपरा खूप जुनी आहे. येथे शेतकरी शेतीसोबतच पशुपालन करून अधिक पैसे कमवू शकतात. त्यामुळेच गाई-म्हशींच्या नवीन जातीचे संगोपन करून त्यांचे दूध विकले जात आहे. गाई आणि म्हशींच्या अनेक प्रजाती जास्त दूध देतात. या जाती डेअरी उद्योगासाठी खूप चांगल्या आहेत. गाईच्या दुधापेक्षा म्हशीच्या दुधाला प्राधान्य दिले जाते. याचे कारण म्हणजे म्हशीचे दूध गाईच्या दुधापेक्षा जाड असते. म्हशीची मुऱ्हा ही जात जास्त दूध देणारी जात मानली जाते. देशातील मोठ्या संख्येने पशुपालक ते पाळतात आणि चांगला नफाही मिळवतात. याशिवाय या म्हशीची दूध देण्याची क्षमताही इतर जातींपेक्षा जास्त आहे. मुर्रा जातीच्या म्हशीचा रंग काळा असतो. याशिवाय त्याची शिंगेही वक्र असतात. मुर्राह म्हशीचे डोके लहान आणि लांब शेपूट असते. तसेच त्याचा मागील भाग चांगला विकसित झाला आहे.



राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत

रविवार दि.२० सप्टेंबर २०२६ ५




# परतूर शहरात विकासकामांचा धडाका

## शहरातील प्रत्येक अंतर्गत रस्ता सिमेंट काँक्रीटचा करणार–राहुल लोणीकर

जालना। प्रतिनिधी

आमदार बबनराव लोणीकर यांच्या माध्यमातून परतूर नगरपालिकेला उपलब्ध झालेल्या विकासनिधीतून शहरातील विविध विकासकामांना मोठ्या प्रमाणात गती मिळाली असून, शहरातील तब्बल १ कोटी १५ लक्ष रुपये किमतीच्या शहरांतर्गत सिमेंट रस्ते नाली बांधकाम तसेच लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीचे भूमिपूजन जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. भूमिपूजनाच्या निमित्ताने बोलताना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांनी परतूर शहराच्या विकासाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, परतूर शहरातील नागरिकांना दर्जेदार आणि कायमस्वरूपी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हे आमदार बबनराव लोणीकर यांचे प्राधान्य आहे. शहरातील प्रत्येक रस्ता टप्प्याटप्प्याने सिमेंट काँक्रीटमध्ये बांधण्याचा प्रयत्न करण्यात येणार असून, विकासकामांच्या माध्यमातून परतूर शहराचा चेहरामोहरा बदलण्याचा संकल्प आहे.




शहरातील विविध भागांमध्ये सिमेंट काँक्रीटचे रस्ते झाल्यामुळे नागरिकांची वाहतूक अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे. पावसाळ्यात रस्त्यांची होणारी दुरवस्था, चिखल आणि वाहतुकीच्या अडचणी यावरही कायमस्वरूपी उपाय करण्याच्या दृष्टीने ही कामे अतिशय महत्वाची असल्याचे या वेळी राहुल लोणीकर यांनी नमूद केले. शहरातील नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन विकासकामांना प्राधान्य देण्यात येत असल्याचेही यावेळी राहुल लोणीकर यांनी सांगितले.शहराच्या सौंदर्यात भर घालणारे उद्यान लवकरच नागरिकांसाठी उपलब्ध व्हावे या साठी आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते नमो उद्यानाचे भूमिपूजन संपन्न होणार असल्याचे यावेळी त्यांनी बोलताना सांगितले पुढे बोलताना ते म्हणाले की, परतूर शहरांमध्ये या उद्यानाच्या माध्यमातून नागरिकांना मोकळी आणि हिरवाईने नटलेली जागा उपलब्ध होणार असून, सकाळ–संध्याकाळ फिरण्यासाठी तसेच कुटुंबासह वेळ घालवण्यासाठी चांगली सुविधा निर्माण होणार आहे.

परतूर शहरातील रस्ते, नागरी सुविधा आणि सौंदर्यीकरणाच्या कामांना गती देत शहराला नियोजनबद्ध विकासाच्या दिशेने घेऊन जाण्याचा प्रयत्न सुरू असून, आगामी काळातही विविध विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू राहणार असल्याचे राहुल लोणीकर यांनी सांगितले.पुढे बोलताना राहुल लोणीकर म्हणाले की, परतूर शहरातील गाव भागाचा विकास केला जात नाही अशा प्रकारची ओरड विरोधकांनी या आधी केली होती मात्र परतुर शहराचा समतोल विकास करणे ही आमची जबाबदारी असल्याचे सांगत येणाऱ्या काळामध्ये शहरातील सर्व भागांमध्ये विकास कामे दिसतील असेही यावेळी त्यांनी सांगितले.

यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले, नगराध्यक्ष प्रियंका ताई राक्षे भाजपा शहराध्यक्ष प्रवीण सातोनकर, संदीप बाहेकर शहाजी राक्षे नगरसेवक विनायक काळे , विजय नाना राखे, प्रकाश चव्हाण, अखिल काजी, सोनू अग्रवाल, सावता काळे कदीर कुरेशी, सतीश सोनवणे, सज्जाद भाई, इजरान कुरेशी, तोफिक भाई रज्जाक कुरेशी , संजय राऊत, ऋषिकेश कार्हाळे संतोष चव्हाण संभाजी घनवट अर्जुन जगताप आकाश राक्षे, दीपक पुरी, नितीन खरात लक्ष्मीकांत राऊत, विजय यादव, बंडू मानवतकर अमोल संजय देशमाने रमाकांत बरिदे, रमेश राऊत संदिपान माने प्रकाश कर्डिले विष्णू तरासे राजू राऊत शिवम कांगणे बंडू मानवतकर मुज्जू कायमखानी मलिक कुरेशी शहानवाज कुरेशी रंगनाथ काळे सोना मामा काळे अरुणराव मगर अहमद हाजी साहब मारुती पाटोळे दवणे अण्णा श्री घाटे, आबासाहेब अंभोरे नितीन भोसले नितीन यादव दिलीपराव मस्के रामेश्वर गांजे श्याम अंभोरे दत्ता दौंड यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

## देशासाठी काम करणारी माणसे अमर झाली–रामकृष्ण रंधवे बापू



पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित वसंतदादा पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पाटोदा येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ह भ प रामकृष्ण रंधवे बापू प्रमुख अतिथी म्हणून लाभले होते, तर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. बळीराम राख,उपप्राचार्य प्रा. डॉ. अभय क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. सोनाजीराव गायकवाड, पदव्युत्तर विभागाचे संचालक डॉ. गणेश पाचकोरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. अनिल जोगदंड, कार्यालयीन अधीक्षक श्री. चंद्रकांत पवार, आणि पर्यवेक्षक प्राध्यापक दयानंद सरपते यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमात प्रारंभी मराठवाडा मुक्ती संग्रामामध्ये महत्त्वाचे योगदान दिलेले मराठवाड्याचे नेते स्वामी रामानंद तीर्थ आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर ह भ प रंधवे बापू यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत संपल्यानंतर आपल्या मनोगतात उपस्थितांना उद्देशून रामकृष्ण रंधवे बापू यांनी हैदराबाद मुक्तिसंग्राम लढा आणि त्यातून उदयास आलेल्या निजाममुक्त मराठवाड्याची यशोगाथा वर्णन केली. त्याचबरोबर, '' मराठवाड्याला निजामाच्या जुलमातून मुक्त करण्यासाठी अनेक हुतात्म्यांना संघर्ष करावा लागला. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली उभा राहिलेल्या मराठवाडा मुक्ती चळवळीमध्ये बीड जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी हिरिरीने भाग घेतला. यामध्ये माजी खासदार रामराव आवरगावकर, माजी खासदार स्वर्गीय केशर काकू क्षीरसागर, द्वारकादास मंत्री, बन्सीधर जाधव इत्यादींचे योगदान महत्त्वाचे राहिले. या सर्वांनी निःस्वार्थी देशप्रेमातून देशासाठी काम केले, म्हणूनच ती अमर राहिली. '' अशा प्रकारचे वक्तव्य केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. बळीराम राख यांनी उपस्थित सर्वांना मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर विविध विभागांच्या भित्तीपत्रकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिक्षक प्रतिनिधी प्रा. डॉ. काकासाहेब पोकळे यांनी केले तर प्रा. डॉ. सोनाजी गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या आयोजन व नियोजनामध्ये शारीरिक शिक्षण विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. विनोद पवार आणि डॉ. तानाजी आगळे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व कर्मचारीवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## कारागिरांनी उद्योग विस्तारासाठी शासकीय योजनांचा लाभ घ्यावा -रमेश मिसाळ

जालना। प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त जालना जिल्ह्यातील पीएम विश्वकर्मा योजना लाभार्थी मेळाव्याचे आयोजन जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. मेळाव्याचे उद्घाटन अतिरिक्त जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर, जिल्हा उद्योग केंद्राचे उपआयुक्त योगेश सारणीकर, एमएसएमईच्या सहायक संचालिका श्रीमती सुनिता, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाचे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी तथा पीएम विश्वकर्मा योजनेचे सदस्य सचिव रुपेश आचारी, ज्येष्ठ पर्यवेक्षक विष्णू कायंदे तसेच मंडळाचे कर्मचारी उपस्थित होते.

मेळाव्याच्या प्रारंभी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी रुपेश आचारी यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करताना पीएम विश्वकर्मा योजनेची उद्दिष्टे, लाभार्थ्यांची पात्रता, योजनेअंतर्गत मिळणारे प्रमाणपत्र, टूलकिट तसेच उद्योग सुरू करण्यासाठी किंवा उद्योगवाढीसाठी बँकांमार्फत उपलब्ध होणाऱ्या कर्ज सुविधांची माहिती दिली.यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या हस्ते पीएम विश्वकर्मा योजनेतील लाभार्थी उद्योजकांना टूलकिट तसेच कर्ज मंजुरी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात श्री. मिसाळ यांनी पारंपरिक कारागिरांच्या उद्योजकीय प्रवासाचे कौतुक केले. कारागिरांनी उद्योगाचा विस्तार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा तसेच आपल्या उत्पादनाचे प्रभावी ब्रँडिंग करून बाजारपेठेत स्वतंत्र ओळख निर्माण करावी, असे आवाहन त्यांनी केले.जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार यांनी पीएम विश्वकर्मा उद्योजकांनी आपला सिबिल/क्रेडिट स्कोअर चांगला राखल्यास बँकांकडून कर्जपुरवठा सुलभ होण्यास मदत होऊ शकते, असे सांगितले. मेळाव्यात पीएम विश्वकर्मा योजनेच्या काही लाभार्थी उद्योजकांनी आपली यशोगाथा व मनोगत व्यक्त केले. पारंपरिक कारागिरांसाठी योजना उपयुक्त असून अधिकाधिक उद्योजकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

## मराठवाडा अर्बन बँक्स असोसिएशनच्या संचालकपदी संजय मुथा यांची बिनविरोध फेरनिवड



जालना । प्रतिनिधी

मराठवाड्यातील सहकारी बँकांची प्रमुख संस्था असलेल्या मराठवाडा अर्बन बँक्स को–ऑप. असोसिएशन लि.**च्या सन २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी संचालक मंडळाची बिनविरोध निवड झाली. यामध्ये जालना येथील माजी अध्यक्ष तथा विद्यमान संचालक संजय मुथा यांची संचालकपदी बिनविरोध फेरनिवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी किरण एम. चौधरी यांनी जाहीर केले.

संजय मुधा यांनी यापूर्वी २००६–२०११ तसेच २०१६–२०२६ या कालावधीत असोसिएशनचे संचालक म्हणून काम पाहिले आहे. आपल्या कार्यकाळात त्यांनी सहकारी बँकांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा केला. मराठवाड्यातील बँकिंग क्षेत्राला अधिक चालना मिळावी, सहकारी बँकांना शासन व रिझर्व्ह बँकेच्या माध्यमातून आवश्यक सहकार्य मिळावे, तसेच स्थानिक नागरिक व खातेदारांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी योगदान दिले. संजय मुथा यांच्या कार्याचा अनुभव लक्षात घेऊन त्यांची पुन्हा संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवर, बँकिंग क्षेत्रातील व्यक्ती, सभासद व हितचिंतकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनच्या उपक्रमाचे लातूर पोलिसांकडून कौतुक

### रक्तदान करणाऱ्या ८० रक्तदात्यांना हेल्मेटचे वाटप

लातूर । प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ८० रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास फाउंडेशनच्या वतीने हेल्मेटचे वाटप करण्यात आले.लातूर जिल्ह्यात वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर लातूर पोलीस दलाच्या वतीने १ सप्टेंबर २०२६ पासून संपूर्ण जिल्ह्यात हेल्मेट सक्तीचा उपक्रम राबविण्यात येत आहे. लातूर पोलीस विभागाच्या वतीने हेल्मेट वापराबाबत विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येत असून, दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा नियमित वापर करावा, यासाठी सातत्याने आवाहन करण्यात येत आहे.




या उपक्रमाला आता विविध सामाजिक संस्था, गणेश मंडळे आणि नागरिकांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. रक्तदानासारख्या समाजोपयोगी उपक्रमासोबत हेल्मेटचे वाटप करून आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनने सामाजिक बांधिलकी जपण्याबरोबरच रस्ते सुरक्षेचा संदेश दिला आहे.हेल्मेट वापराचे प्रमाण १०० टक्के होईपर्यंत जनजागृती व कारवाईचा हा उपक्रम सुरू राहणार असल्याची भूमिका लातूर पोलीस दलाने स्पष्ट केली आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक संस्थांकडून राबविण्यात येणारे अशा प्रकारचे उपक्रम नागरिकांमध्ये हेल्मेट वापराबाबत सकारात्मक वातावरण निर्माण करण्यास उपयुक्त ठरत आहेत.आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनच्या या स्तुत्य उपक्रमाचे लातूर पोलीस दलाच्या वतीने कौतुक करण्यात आले असून, भविष्यातही अशाच समाजाभिमुख आणि जनजागृतीपर उपक्रमांसाठी संस्थेला शुभेच्छा देण्यात आल्या. सदर कार्यक्रमास लातूर शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. जिरगे उपस्थित होते.

## देवणीत डीजे–डॉल्बीच्या दणदणाटावर पोलिसांचा हातोडा; वाहनासह साहित्य जप्त, गुन्हा दाखल

लातूर। प्रतिनिधी

गणेश विसर्जनाच्या आनंदावर डीजे–डॉल्बीच्या कर्णकर्कश आवाजाने विरजण घालणाऱ्यांना लातूर पोलिसांनी चांगलाच दणका दिला आहे. शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवून विना परवानगी डीजे वाजवल्याप्रकरणी देवणी पोलिसांनी मौजे मोघा येथे मोठी कारवाई केली असून, वाहनासह लाखो रुपयांचे डीजे साहित्य जप्त केले आहे.दि. १८ सप्टेंबर २०२६ रोजी मोघा (ता. देवणी) येथे श्री राजे गणेश मंडळाची गणेश विसर्जन मिरवणूक सुरू होती. या मिरवणुकीत मंडळाचे कार्यकर्ते सुधाकर गोविंद हनमंते, रा. सय्यदपूर, ता. देवणी व इतरांनी शासनाची कोणतीही परवानगी न घेता मोठ्या आवाजात डीजे–डॉल्बीचा वापर केला –२४––८६०५* क्रमांकाच्या वाहनावर अवजड डीजे सिस्टीम बसवून मोठ्या आवाजात गाणी वाजवली जात होती.

ज्या वाहनावर डीजे बसवला होता, त्या वाहनाच्या मूळ रचनेत प्रादेशिक परिवहन



अधिकारी यांची कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीरपणे बदल करण्यात आला होता. म्हणजे एकीकडे ध्वनी प्रदूषण तर दुसरीकडे मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन.या प्रकरणी देवणी पोलीस ठाण्यात *गुन्हा रजिस्टर नंबर ३२१/२०२६* दाखल करण्यात आला आहे. संबंधितांवर *भारतीय न्याय संहिता () कलम २२३, कलम ३(५) तसेच मोटार वाहन कायद्याच्या* संबंधित कलमांन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.पोलिसांनी कारवाई करत *–२४––८६०५ हे वाहन आणि संपूर्ण डीजे–डॉल्बी सिस्टीम, स्पीकर, अँप्लीफायर जप्त केले आहे. जप्त मुद्देमालाची किंमत लाखो रुपयांच्या घरात असल्याचे सांगण्यात येते.या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस नाईक १५८१ गुणाले हे करीत आहेत. गणेशोत्सव २०२६ सुरू होण्यापूर्वीच लातूरचे पोलीस अधीक्षक यांनी जिल्ह्यातील सर्व गणेश मंडळांची बैठक घेऊन स्पष्ट आदेश दिले होते. गणेशोत्सव हा शांततेत, भक्तिमय वातावरणात आणि पारंपारिक ढोल–ताशा, लेझीमच्या गजरात साजरा करावा. डीजे–डॉल्बीमुळे ध्वनी प्रदूषण होते, वृद्ध, लहान मुले, रुग्णांना त्रास होतो आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे कोणत्याही मंडळाने डीजे–डॉल्बीचा वापर करू नये.''

असे असतानाही काही मंडळांनी या आदेशाकडे दुर्लक्ष केले.''देवणी येथील कारवाई ही सुरुवात आहे. जिल्ह्यात कुठेही विना परवानगी डीजे–डॉल्बीचा वापर झाल्यास वाहनासह साहित्य जप्त करून संबंधित मंडळाच्या अध्यक्ष व चालकावर गुन्हा दाखल केला जाईल. सर्वांनी पारंपारिक वाद्यांचा वापर करावा,'' असा सज्जड दम लातूर पोलिसांनी दिला आहे. सदरची धडक कारवाई देवणी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक खोडेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. लातूर पोलिसांचे नम्र आवाहन – उत्सव आनंदाचा असावा, त्रासाचा नाही. डीजे–डॉल्बी टाळा, पारंपारिक वाद्यांचा नाद लावा.

## उदगीर बस स्थानकातील आरक्षण व्यवस्था कोलमडली

### प्रवाशांची ससेहोलपट, स्थानक प्रमुखांनी हात झटकले

उदगीर । प्रतिनिधी

राज्य परिवहन महामंडळाच्या उदगीर आगारातील आरक्षण व्यवस्था मागील दोन महिन्यांपासून कोलमडली असून, याकडे स्थानक प्रमुखांनी' हात झटकून ' माझा यात काहीच संबंध नसल्याचे संकेत दिले. यावरून अधिकारी एस.टी.च्या हितासाठी नव्हे तर स्वतःच्या 'लाभा'साठी काम करत आहेत की काय अशी खोचक प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने प्रवाशांच्या सेवेसाठी आगाऊ तिकीट विक्री अर्थात 'आरक्षण' सुविधा सुरू केली आहे.मात्र ,उदगीर आगारातून लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी आरक्षण व्यवस्था बंद आहे. याबाबत 'आमच्या'प्रतिनिधीने स्थानक प्रमुख अशोक पवार यांना याबाबत विचारले असता त्यांनी 'वरूनच' बंद आहे म्हणत हात झटकले.यावरून त्यांची 'कर्तव्य' तत्परता दिसून येते. लातूर बसस्थानकात सकाळच्या आणि सायंकाळच्या सत्रात आरक्षण व्यवस्था चालू आहे.तसेच लातूर जिल्ह्यातील औसा, निलंगा, अहमदपूर येथील बसस्थानकात आरक्षण सुरळीत चालू आहे. मागील काही महिन्यांपासून उदगीर बसस्थानकाच्या विशेषतः स्वच्छता बाबतच्या बातम्या सर्वच वर्तमानपत्रात छापून आले आहेत. मात्र ,यावर वरिष्ठांनी कुठलीच कारवाई केली नाही असेच दिसून येते.बसस्थानक परिसरात आजूबाजूचे व्यापारी कचरा आणून टाकतात याकडेही स्थानक प्रमुख लक्ष देत नाहीत.तसेच खाजगी कार चालक आपली वाहने बस स्थानकात लावून एस.टी.च्या प्रवाशांना आपल्या वाहनाकडे घेऊन जातात अशा लोकांना बस स्थानक परिसरातून बाहेर काढण्याचे धाडस हे अधिकारी करत नाहीत.

# तांदळासह ट्रक पोलीस ठाण्यात

## सदर तांदूळ रेशनचा की अंगणवाडीचा? चौकशी सुरू


बीड । प्रतिनिधी

पाटोद्याकडून मांजरसुंबा मार्गे १२ टायर ट्रक अचानक मांजरसुंबा नजीक पलटी झाला या ट्रकमध्ये तांदूळ दिसून आल्याने नागरिकांनी हा रेशनचा तांदूळ असावा आणि काळ्या बाजारात विक्रीसाठी जात असल्याचा संशय आल्याने त्यांनी पोलिसांना याची माहिती दिली. रात्री उशिरा पोलिसांनी तांदळासह ट्रक ताब्यात घेत पोलीस ठाण्यामध्ये लावला. विशेषतः तांदूळ स्वस्त धान्य दुकानावरील आहे की अंगणवाडीतील सकस आहार? याबाबत चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

शुक्रवारी रात्री अकरा वाजण्याच्या दरम्यान पाटोद्याकडून मांजरसुंबाच्या दिशेने निघालेला १२ टायर ट्रक क्रमांक .०९/६८ ५५ च्या चालकाच्या निष्काळजीपणामुळे वळणावर हा १२ टायर ट्रक पलटी झाला. ट्रक पलटी झाल्याने बाजूलाच असलेल्या खंडाळा व जाधव वस्ती येथील नागरिक जमा झाले.कोणाला काही दुखापत झाली असेल तर पाहत असताना सदर ट्रकमध्ये तांदळाच्या गोण्या आढळून आल्या. ट्रक अपघातग्रस्त झाल्याने हा तांदूळ इतरत्रही पडला होता. त्यामुळे हा तांदूळ स्वस्त धान्य दुकानावरील असावा म्हणून काही नागरिकांनी नेकनूर पोलिसांना याची माहिती दिली. या घटनेनंतर काही वेळानेच दोन अनोळखी वाहने आली. त्यांनी चालकांना गाडीत बसवून पोलीस ठाण्याकडे नेले. त्यानंतर रात्री दोनच्या सुमारास पुन्हा दुसरी एक ट्रक आली.. त्यामध्ये हा तांदूळ हलवण्यात आला होता. अशी माहिती देण्यात आली.मात्र उशिरा नेकनूर पोलिसांशी संपर्क साधला असता अपघात ग्रस्त ट्रकसह यामध्ये असलेला तांदूळ पोलीस ठाण्यामध्ये ठेवण्यात आल्याचे सांगण्यात आले. प्रामुख्याने या संदर्भात तेथील ठाणे प्रमुख मंगेश साळवे यांच्याशी संपर्क केला असता ते म्हणाले की तांदळासह ट्रक नेकनूर पोलीस ठाण्यामध्ये असून त्यातील तांदूळ रेषणचा आहे की अंगणवाडीचा सकस आहार? या संदर्भात चौकशी सुरू आहे.

### जामखेड-आष्टी कनेक्शन

स्वस्त धान्याचा काळाबाजार यापूर्वी मोठ्या प्रमाणात होत होता. मात्र आता ऑनलाईन प्रक्रिया सुरू झाल्याने याला काहीसा ब्रेक लागला आहे. परंतु तरीही त्यावर पर्याय काढला जात असून तांदळाचा जो ट्रक पलटी झाला. त्या संदर्भात चालक फोनवर बोलताना आष्टी, पाटोदा, जामखेड येथे संपर्क करत असल्याचे प्रत्यक्ष दर्शींनी सांगितले.





# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहाय्यता निधीतून चार रुग्णांना ३ लाखांची मदत, आ.धस यांच्या पाठपुराव्याला यश

## नवजात बाळांसह जुळ्या बाळांच्या उपचारासाठी आर्थिक आधार

आष्टी । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री सहायता निधी योजनेतून आष्टी विधानसभा मतदारसंघातील गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. आष्टी व शिरूर कासार तालुक्यातील चार रुग्णांच्या वैद्यकीय उपचारासाठी एकूण ३ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे.



आष्टी तालुक्यातील खुंटेफळ (पुंडी) येथील दिपाली अगासे याच्या नवजात बाळाच्या उपचारासाठी ५० हजार रुपये मुख्यमंत्री सहायता निधीतून मंजूर करण्यात आले आहेत. नवजात बाळाच्या उपचारासाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय खर्चामुळे कुटुंबासमोर आर्थिक अडचण निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत मिळालेल्या मदतीमुळे उपचारासाठी मोठा आधार मिळणार आहे.

तसेच डोंगरगण, ता. आष्टी येथील कल्पना पवार यांच्या जुळ्या नवजात बाळांच्या उपचारासाठी प्रत्येकी ५० हजार रुपये, अशी एकूण १ लाख रुपयांची मदत मंजूर झाली आहे. दोन्ही बाळांच्या वैद्यकीय उपचारासाठी लागणाऱ्या खर्चाच्या पार्श्वभूमीवर ही मदत कुटुंबासाठी दिलासादायक ठरणार आहे.

याशिवाय शिरूर कासार येथील अनुशा सवासे यांच्या वैद्यकीय उपचारासाठी ५० हजार रुपयांची मदत मुख्यमंत्री सहायता निधीतून मंजूर करण्यात आली आहे. या चारही प्रकरणांमध्ये आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून करण्यात ◀◀ पान ३ वर

# माजलगावात मोकाट कुत्र्यांवर निर्बीजीकरण व लसीकरण मोहीम सुरू

## नगरसेवक शरद यादव यांच्या पाठपुराव्याला यश

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन नगरसेवक शरद यादव यांनी माजलगाव नगर परिषदेकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून शहरात मोकाट कुत्र्यांना पकडणे, त्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे.

मोकाट कुत्र्यांमुळे नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना होणारा त्रास लक्षात घेऊन नगरसेवक शरद यादव यांनी हा प्रश्न नगर परिषद प्रशासनाकडे लावून धरला होता. अखेर नगर परिषद प्रशासनाने याची दखल घेत प्रत्यक्ष कार्यवाही सुरू केली आहे.

या मोहिमेंतर्गत मोकाट कुत्र्यांना पकडून त्यांचे निर्बीजीकरण करण्यात येत असून, त्यानंतर लसीकरणही केले जात आहे. त्यामुळे शहरातील मोकाट कुत्र्यांची संख्या नियंत्रित करण्यासोबतच नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेला प्राधान्य मिळणार आहे. नगरसेवक शरद यादव म्हणाले, ''मोकाट कुत्र्यांचा प्रश्न नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित असल्याने याबाबत सातत्याने पाठपुरावा केला. नगर परिषद प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद देत कार्यवाही सुरू केली असून नागरिकांच्या प्रश्नांसाठी यापुढेही माझा पाठपुरावा सुरू राहील.''

या उपक्रमासाठी मुख्याधिकारी विशाल बालवाडकर, नगराध्यक्ष शिफा बिलाल चाऊस, उपनगराध्यक्ष सहाल भैय्या चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषद प्रशासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सुपरवायझर अभिजीत साळवे (मो. ९०२८९ ९५५४०) यांच्या माध्यमातून मोहिमेचे नियोजन व प्रत्यक्ष कामकाज केले जात आहे. शासन आणि माजलगाव नगर परिषदेच्या संयुक्त प्रयत्नातून मोकाट कुत्र्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सुरू झालेली ही मोहीम नागरिकांसाठी दिलासादायक ठरत आहे.

### विद्यार्थी अभ्यासक्रमासाठी पिंपळवंडी ग्रामपंचायतचा स्तुत्य उपक्रम

# रात्री ७ वाजता 'भोंगा' वाजताच घरातील टी.व्ही,मोबाईल, करमणुकीची साधने स्विच ऑफ

पिंपळवंडी । प्रतिनिधी

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते प्राशन करणारा गुरगुरल्या शिवाय राहणार नाही यात शंकाच नाही. शिक्षणानेच माणूस मोठा होतो. शिक्षणाने मान,सन्मान,प्रतिष्ठा मिळून ज्ञान मिळते.यांत्रिक युगात टी.व्ही व मोबाईलचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे.हे दोन्हीही यंत्र घराघरात लहानापासून थोरापर्यंत पोहोचली आहेत.त्यांचा दोन वर्षाच्या मुलापासून ते विद्यार्थ्यांना खूपच ''लळा'' लागलेला आहे.त्याचा विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमावरही परिणाम होत आहे.त्यावर पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी ग्रामपंचायतने या महिन्यापासून स्तुत्य असा उपक्रम सुरू केला आहे.भावी पिढीच्या उज्वल भविष्यासाठी आणि मुलांमध्ये अभ्यासाची गोडी आवड निर्माण व्हावी.यासाठी ग्रामपंचायत मार्फत गावच्या मारुती मंदिरावर ''भोंगा'' (सायरन) बसविला आहे. हा भोंगा दररोज रात्री ठीक ७ वाजता वाजविला जातो.हा भोंगा वाजताच घरातील टी.व्ही, मोबाईल व करमणुकीचे सर्व साधने बंद करण्यात येतात व विद्यार्थी लगेच अभ्यासासाठी बसतात.रात्री ७ ते ९ ही विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाची वेळ ठरविली आहे.प्रत्येक पालकांनी रात्री ७ ते ९ या वेळेत आपल्या ◀◀ पान ३ वर

# पर्यावरणपूरक सजावटीतून 'जुनं ते सोनं'चा संदेश दिंद्रुडच्या गौरींना म्हाळसा-बानूचा पारंपरिक लुक

दिंद्रूड । प्रतिनिधी

सध्या सर्वत्र थर्माकोल आणि प्लास्टिकच्या सजावटीला पसंती दिली जाते. मात्र माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील सौ. सुनीता व मीरा खांडेकर यांच्या घरी यंदा १००% पर्यावरणपूरक वस्तूंपासून गौरी-गणपती सजावट साकारण्यात आली असून, यातून 'जुनं ते सोनं' हा आगळावेगळा सामाजिक संदेश देण्यात आला आहे.

सजावटीचे मुख्य आकर्षण म्हणजे मुख्य दोन गौरींना श्री खंडोबाच्या पत्नी म्हाळसा आणि बानू यांचा लुक देण्यात आला आहे. मराठमोळी नऊवारी साडी, आडवे धनगरी कुंकू, कोल्हापुरी साज, नथ, ठुशी, खांद्यावर घोंगडी आणि हातात काठी असलेला पारंपरिक वेश यामुळे गौरींचे रूप अधिकच खुलले आहे. पाठीमागे



बांबू आणि ज्वारीच्या धांड्यापासून तयार केलेला खोप व पक्ष्यांची घरटी यांनी ग्रामीण संस्कृती जिवंत केली आहे. ◀◀ पान ३ वर

आधुनिकतेच्या धावपळीत आपण आपल्या आजीच्या काळातील वस्तू विसरत चाललो आहोत. नव्या पिढीला आपली श्रमसंस्कृती कळावी आणि पर्यावरणाचे रक्षण व्हावे, यासाठी मांडलेली ही संकल्पना नव्या पिढीसाठी नक्कीच प्रेरणादायी व मार्गदर्शक आहे. आधुनिकतेत हरवलेली ग्रामीण संस्कृती व परंपरा गौरी सजावटीतून पुन्हा जिवंत झाली आहे.

– सौ. शिल्पा ओमप्रकाश शेटे

# माजलगावात मराठवाड्याचा इतिहास जिवंत होणार! भव्य शाही शस्त्र प्रदर्शनाचे आयोजन

### २१-२२ सप्टेंबरला भव्य ऐतिहासिक प्रदर्शन

माजलगाव । प्रतिनिधी

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले असले तरी हैदराबाद संस्थानातील मराठवाडा निजामाच्या राजवटीत राहिला होता. निजामशाहीविरुद्ध उभारलेल्या हैदराबाद मुक्ती संग्रामात माजलगाव तालुक्यातील अनेक ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांनीही योगदान दिले. उपलब्ध ऐतिहासिक नोंदी, दस्तऐवज आणि स्थानिक इतिहासाच्या साधनांच्या आधारे माजलगाव,



वडवणी व धारूर तालुक्यातील हैदराबाद मुक्ती संग्रामात योगदान देणाऱ्या क्रांतिकारकांचा इतिहास समोर आला आहे. लोकनेते स्व. सुंदररावजी सोळंके यांच्या ९९व्या जयंतीनिमित्त २१ व २२ सप्टेंबर २०२६ रोजी लोकनेते सुंदररावजी सोळंके महाविद्यालय, माजलगाव येथे या क्रांतिकारकांच्या शौर्यगाथेचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत हे प्रदर्शन नागरिकांसाठी खुले राहणार आहे.

या ऐतिहासिक उपक्रमात क्रांतिकारकांचे कार्य, संघर्ष, त्याग आणि हैदराबाद मुक्ती संग्रामातील योगदान विविध ऐतिहासिक संदर्भांसह मांडले जाणार आहे. विशेष म्हणजे, या क्रांतिकारकांच्या कुटुंबीयांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला असून त्यांच्या वारसांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. याशिवाय 'शिवकालीन शाही शस्त्र प्रदर्शन' हे या कार्यक्रमाचे आणखी एक आकर्षण ठरणार आहे. तलवार, भाला, ढाल, कट्यार यांसह पारंपरिक शस्त्रांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या युद्धपरंपरेचा परिचय करून देण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. आ. प्रकाशदादा सोळंके असून उद्घाटक म्हणून राधाकृष्ण ◀◀ पान ३ वर

# महागाई व दुष्काळाच्या सावटात गौराईचा सण उत्साहात

## खर्चाला कात्री लावत महिलांनी जपली पारंपरिक परंपरा; घराघरांत भक्तिमय वातावरण

युसूफवडगाव । प्रतिनिधी

महागाईचा वाढता तडाखा आणि पावसाने दिलेली दडी यामुळे ग्रामीण भागातील जनजीवनावर आर्थिक संकटाचे सावट असतानाही युसूफवडगाव येथे गौराईचा सण मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरा करण्यात आला. महिलांनी आपल्या घरातील परंपरा जपत गौराईची स्थापना करून विधिवत पूजा-अर्चा व आरती केली.

गौराईच्या आगमनानिमित्त घराघरांत स्वच्छता करून आकर्षक सजावट करण्यात आली. फुले, हार तसेच उपलब्ध सजावटीच्या साहित्याचा वापर करून गौराईचा देखावा सजविण्यात आला. महिलांनी गौराईला विविध पदार्थांचा नैवेद्य दाखवून कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. यानिमित्ताने महिलांमध्ये विशेष उत्साह दिसून आला.

दरम्यान, यंदा पूजेचे साहित्य, फुले, फळे, नारळ तसेच इतर आवश्यक वस्तूंच्या किमती वाढल्याने सणाचा खर्च वाढला आहे. त्यामुळे अनेक कुटुंबांनी अनावश्यक खर्च टाळत गरजेपुरतीच खरेदी करून साधेपणाने सण साजरा केला. आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असली तरी श्रद्धा आणि परंपरेत कोणतीही कमतरता राहू नये, याची काळजी महिलांनी घेतली. दुसरीकडे पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंतेत असून सोयाबीनसह विविध पिकांवर पाण्याअभावी संकट निर्माण झाले आहे. पिकांच्या उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता असल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही त्याचा परिणाम जाणवत आहे. मात्र या संकटाच्या काळातही गौराईच्या सणामुळे गावातील वातावरण काही काळ आनंदी आणि भक्तिमय झाले. महागाई आणि दुष्काळाचे सावट असतानाही महिलांनी श्रद्धा, संस्कृती आणि परंपरेला जपत गौराईचा सण उत्साहात साजरा केला.



# आ.सुरेश धस यांच्या संकल्पनेतून 'रोज एक तास श्रमदानासाठी' मोहिमेला आष्टीत उत्स्फूर्त प्रतिसाद!

## पिंपळेश्वर मंदिर परिसरातून आ.धस यांच्या हस्ते शुभारंभ; कर्जत येथील सर्व सामाजिक संघटनेच्या सदस्यांचा सहभाग

आष्टी । प्रतिनिधी

शहर स्वच्छ, सुंदर, हिरवेगार आणि विकसित करण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग असावा, या उद्देशाने आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतून 'रोज एक तास श्रमदानासाठी' या अभिनव लोकसहभागाच्या मोहिमेचा शुभारंभ पिंपळेश्वर मंदिर परिसरात करण्यात आला. या उपक्रमाला आष्टीकर नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतील या उपक्रमाचा मुख्य उद्देश शहराच्या स्वच्छतेसोबतच पर्यावरण संवर्धनाला चालना देणे आणि 'माझे शहर, माझी जबाबदारी' या भावनेतून नागरिकांना श्रमदानासाठी प्रोत्साहित करणे हा आहे. प्रशासनाच्या प्रयत्नांना नागरिकांच्या सहभागाची जोड मिळाल्यास शहराचा कायापालट अधिक प्रभावीपणे होऊ शकतो, या विचारातून या मोहिमेची संकल्पना पुढे आली आहे. दररोज एक तास श्रमदानाच्या माध्यमातून शहरातील विविध भागांमध्ये परिसर स्वच्छता, वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन यांसारखी कामे केली जाणार आहेत. आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतील ही मोहीम केवळ एका दिवसापुरती मर्यादित न ठेवता नित्यनियमाने सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. या उपक्रमात शहरातील सर्व सामाजिक संघटना, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच सर्वसामान्य नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, हा संदेश या मोहिमेतून देण्यात येत आहे.

विशेष म्हणजे कर्जत शहरातील सर्व सामाजिक संघटनेच्याच्या सदस्यांनीही आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतील या उपक्रमाच्या शुभारंभास उपस्थित राहून श्रमदानात सहभाग नोंदविला. त्यांच्या या सहभागाबद्दल यावेळी सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. कर्जतच्या सामाजिक संघटनांनी आष्टीकरांना दिलेली ही प्रेरणा उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करणारी ठरली. आष्टी शहरात सुरू झालेल्या या लोकसहभागाच्या उपक्रमाचा विस्तार पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांतही लवकरच करण्यात येणार आहे. त्यामुळे आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतील 'एक तास श्रमदान' ही चळवळ तीनही तालुक्यांमध्ये व्यापक स्वरूप घेण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. स्वच्छ, सुंदर आणि हिरवीगार आष्टी घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने दररोज आपल्या वेळेतील एक तास श्रमदानासाठी द्यावा आणि आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतील या लोकसहभागाच्या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. 'एक तास श्रमदान... स्वच्छ आष्टीचा संकल्प!' या भावनेतून सुरू झालेल्या या मोहिमेला मिळालेला नागरिकांचा प्रतिसाद पाहता आष्टीच्या स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने ही चळवळ महत्त्वपूर्ण ठरण्याची चिन्हे आहेत.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26